# वेलांटी

कान्त



१९६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १९६२
REFBK-0012740

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
राज्य
संपूर्ण योजना
१९७०

# वेलांटी

कान्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. १२८८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ४५११८ वि: काव्य
क्रमांक १९६२ नों: दि: १८।३।८१

REFBK-0012740
REFBK-0012740

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन : ७३

पहिली आवृत्ति : ऑगस्ट १९६२

© १९६२, वा. रा. कान्त

किंमत ४ रुपये ५० नये पैसे

मुखपृष्ठ : दीनानाथ दलाल

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

अ र्प ण

मेहुण्या भिंवईस—
जिच्या वेलांटीनं
अर्थवे जीवन
फूलपणीं.

## शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | २१ | मध्यरात्रींचो | मध्यरात्रीचा |
| ४ | १५ | उच्छ्वास | उच्छ्‌वास |
| ८ | ५ | गगनवेधी | गगनवेंधी |
| ९ | ११ | पात्रीं | पानीं |
| २० | ११ | फुल्ली | फुटले |
| ३१ | मथळा | चांदण्याचा | चांदण्याची |
| ३१ | १४ | खुडिलेले | खुटल्ले |
| ३५ | १८ | तेजवपाणी | तेजात्रपाणी |
| ३८ | ५ | पचम | पंचम |
| ५६ | ३ | विल्गती | त्रिलगती |
| ७८ | २० | आनंद | आनंदच |
| ८५ | १७ | उफाळ | उफाळे |
| १०९ | ११ | पद्दे | उद्दे |
| ११५ | ५ | दु:खानलें | दु:खानलिं |
| १२४ | १५ | थकण्याच्या | थकव्याच्या |

# अनुक्रम


१ वेलांटी १
२ निळें कबूतर २
३ पुतळा ४
४ तुला झोपेंत हसूं आलें ५
५ चकमक झडली आहे ६
६ गोड आंबट उगीर ९
७ ओले हिरवे दिवस ११
८ स्पर्शें केसाळ काळोख १२
९ मिठी १४
१० गोष्ट सांगतों एक फुलाची १६
११ जाग आली पावसानं २४
१२ वर २६
१३ जाग २७
१४ चांदणें हें डहुळेल २८
१५ आरसा हा नको नेऊं २९
१६ ओल चांदण्याची ३१
१७ यक्ष ३२
१८ नागासाकीचे अंध ३४
१९ स्वप्न रात्र ही सांभाळ ३८
२० दीपछाया ४०
२१ ही दुपार ४१
२२ कांही काळ्या निळ्या रेषा ४७
२३ मजला ठाउक : तुलाहि माहित ४९
२४ ठिपके ५१
२५ माझ्या मनांत उभी तूं ५५
२६ जन्मायचं नव्हतं मला ५७
२७ कवच ५८
२८ छाया चाफ्याची ५९
२९ धानराजा आला दारीं ६०
३० विझव दीप साजणी ६५
३१ उभी मी सदनीं दीप लावुनी ६७
३२ जोगी ६९
३३ आर्त डोळे शर्मिष्ठेचे ७०
३४ श्वास चांदण्याचे दोन ७२
३५ कातरवेळेला ७५
३६ चंदेरी रात्रीच्या निढळीं ७८
३७ तूं प्रलयाचा यात्रिक ७९
३८ तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें ८१
३९ दीपकळिंत या ८२
४० माती ८३
४१ टिचकी ८४
४२ मी आलें ८५
४३ मेंदीच्या ताटव्याशीं ८६
४४ पुष्कराज—स्मितें ८७
४५ उघड ऊर्मिळे कवाड ८८
४६ धुक्यांत रस्त्यावर ८९

४७ प्रभातरल गुदगुल्या ९०
४८ अशावेळीं जागें कोण ९१
४९ कोजागरी ९३
५० आणि वाहतें शतद्रूती मी ९४
५१ केव्हा १०१
५२ ती पवळ्याची वाट १०२
५३ आणखी एक पान गळलें १०४
५४ कुमारी १०५
५५ सख्या, कां गायिलेंस तें गान १०६
५६ माझाहि न अधिकार १०७
५७ अर्घ्य १०९
५८ भिजूनीहि पावसांत ११०
५९ साजणी आज गातसे रात १११
६० शिशिरगान ११३
६१ चांदणें इथे अश्रु ढाळितें ११२
६२ गीतांच्या पैलतिरीं ११७
६३ कवींद्रा, तें गाणें दे ११८
६४ इतुक्यांत कशी झोंप तुझी झाली! १२२
६५ मी वाट आहें १२४
६६ सय १२७
६७ साठवाया सूर्य १२८

"—एकाकी कबूतराची झोप मोडते
मिटल्या डोळ्यांत स्वप्न नाही
देखत्या डोळ्यांत डोळेपण नाही
उरते वाऱ्यांत फक्त
रातांधळ्या पंखांची एकांत तडफड
जळती वेलांटी मारिते जिला सोनसळी वीज
चमकून दूर तेढीमेढी"

"जुळवितां तुझ्या डोळां
अक्षरें मी आयुष्याचीं
उरे वेलांटीच अंतीं
तुझ्या वक्र भिवयीची"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92680

# वेलांटी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ..............

पीत केशरी पातळ
चोळी हिरवी अंगांत
नेसुनिया आपुलेंच
हसूं आलीस दारांत

स्वागताचे तुझ्या शब्द
जन्मोजन्मीं घोकलेले
भाग्य-उजरीच्या वेळीं
कोसळोनी मौनी झाले

जुळवितां तुझ्या डोळां
अक्षरें मी आयुष्याचीं
उरे वेलांटीच अंतीं
तुझ्या वक्र भिवयीची

पण उभी कां तूं अशी ?
सोड दाराची चौकट
तुझ्या ओठांच्या रेषांशीं
माझी अडली ना वाट ?

वाट अडूं दे अशीच
रात्र इथेच पडूं दे
तुझ्या देहाच्या दिव्याशीं
तम गहिरें होऊं दे
माझी सावली सरूं दे

१९-३-६२

# निळें कबूतर

उंच छतांत
तापलेल्या पत्र्याच्या वळचणीखाली
सुस्त सावलींत
निळें कबूतर बसलें आहे
एक मोरपंखी टिंब—मऊ पिसांचें!
सात ताळाच्या माड्यांवरून
दाटलेल्या मळक्या घामट ढगांत
उकाड्याने दिवस शिजतो आहे
सरत्या ज्येष्ठाचा घननीळ श्वास
(तडकत्या मातीसाठी जपून ठेवलेला)
त्या पारव्या उरांत फुलतो आहे
धडधडतो आहे
निळें कबूतर बसलें आहे.

उंच छतांत
ओल्या पत्र्याच्या वळचणीखाली
कुबट अंधारांत
निळें कबूतर झोपलें आहे
पंख मिटून
चोच खुपसून, आपल्याच उरांत
सात ताळाच्या माड्यांवरून
मध्यरात्रींची
हलका, अबोल, पिसाट पाऊस
खिन्नपणें बरसत आहे
निळ्या निजल्या घरांवरून
भोगदीप्त पेंगत्या काचबंद खिडक्यांवरून

कलत्या पत्री छतावरून
अंग चोरून झोपलेल्या पाखराच्या पंखावरून
गळती धारा
अन् एकाकी कबूतराची झोप मोडते
मिटत्या डोळ्यांत स्वप्न नाही
देखत्या डोळ्यांत डोळेपण नाही
उरते वाऱ्यांत फक्त
रातांधळ्या पंखांची एकांत तडफड
जळती वेलांटी मारिते जिला सोनसळी वीज
चमकून दूर तेढीमेढी—
निळें कबूतर बसलें आहे.

उंच छताच्या पन्ह्यावरून
सात ताळाच्या माडयांवरून
थकल्या दिपल्या काचखुळ्या खिडक्यांच्या डोळ्यांवरून
रस्त्याच्या डांबरी ओठावरून
पसरलें आहे सकाळचें
उन्हाळ हसूं
वळचणीखालचें निळें कबूतर
वाळवीत पंख ऐटींत फिरतें
शहाण्यासारखें कांही टिपतें
कलत्या मानेंत आकाश तोलतें
मध्येच चमकतो उन्हांत त्याचा डोळा
रक्ताचा थेंब
माणकाचा कोंभ!
परंतु
युगविरहीचें त्यांत जागरण जळतें आहे
निळें कबूतर बसलें आहे.

मुंबई, ११-८-६०

## पुतळा

पाठीमागे
पश्चिम समुद्राचें महाद्वार जांभई देत आहे
समोर
शतकांच्या काळ्या कोसांवरुन वाहात येणाऱ्या
लाटा आपटत आहेत
मध्ये पायरीवर मी उभा आहें
उदास एकाकी
आकाशाचें नातें
या सनातन लाटांत फुटून गेलें—खुळ्या फेसाप्रमाणे
पृथ्वीचे हिरवे पाश
गळून पडले—पिवळ्या पाचोळ्याप्रमाणे
मध्ये पायरीवर उभा आहें
रिता एकाकी मी—
धरित्रीचा एक श्वास
नियतीचा एक उच्छवास—विरणारा
शून्य निळाईंत एका क्षणाच्या

हजार डोळे भोवती बघतात
पण कोणीच ओळखत नाही
त्या वटारलेल्या डोळ्यांच्या चकित क्षणांत
बनतों मी प्राणहीन पुतळा—
केवळ वस्त्रांचें प्रदर्शन करणारा—
अनोळखी हाटांतला
प्राणहीन पुतळा.

मुंबई, २७-९-६०

# तुला झोपेंत हसूं आलें

एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें
सांगे शहारा पऱ्यांच्या देशीं नीज-लतेला फूल आलें

शांत झांकले टपोर डोळे
ओठ हासरे चुंबन-ओले
गोरव्या भाळीं कुरळ गालीं माझ्या निःश्वासें मंद हाले
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

चंद्र पेंगतो स्तब्ध झाडांत
रात्र जांभळी पिके दर्यांत
हे वारेही नीडबावरे पानापानांत दुखरे झाले
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

मिठींत साऱ्या विरून व्यथा
उरल्या चंद्रा-अमृताच्या कथा
अरध्या रात्रीं शिणल्या गात्रीं सुखऽदुःख फुला आलें
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

कशी स्मिताची चांदणी वाट
इथे रात्रीला नसतो काठ
या वाटेने दुःख जगाचें युगानुयुगें चालत गेलें
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें
तुला झोपेंत हसूं आलें

मुंबई, १२-१०-६०

# चकमक झडली आहे

मातीच्या मनांत चकमक झडली आहे
आज अंधाराच्या महाखंडांत एक ज्योत जागली आहे
त्या शलाकेंत
सर्पमण्यांचें खुनशी तेज फूत्कारतें
सिंहाच्या डोळ्यांतील मृत्यूचे टेंबे लखलखतात
पण वाऱ्या, थांव,
असा रौरवत वाहूं नकोस
कदाचित् या ज्योतीच्या वेताळाच्या दिवट्या होतील
वणवे पेटतील सांबरांच्या शिंगांतून
वाऱ्या, थांब,
चकमक झडली आहे मातीच्या मनांत

विषुववृत्ताच्या कुशींत
सूर्याच्या वीर्याने हा देश जन्मला आहे
काळ्या जंगलापलीकडील शतकांच्या धुक्यांत वाकून
कोण वाचीत आहे
गूढ भीषण पिरॅमिड्स्ची तिरकस दगडी बाराखडी ?
रुद्ध श्वासांचा नि वाहत्या रक्ताचा अर्थ लावीत
कोण बसलें आहे
स्फिंक्सच्या पापणीहीन डोळ्यांत ?
साखळदंडांनी ओढीत नेलेल्या गुलामांच्या
वाळूवरील पदचिन्हांना
प्रतिकाराची लय सापडली आहे काय ?
चकमक झडली आहे मातीच्या मनांत.

वांझ वाळवंटांतील रेती गर्भवती झाली आहे
घनदाट अरण्यांत पेटलेल्या कटोहाभोवती
मस्तींत नाचत आहेत
अर्धनग्न काळीं शिसवीं अंगें
यौवनाचे काळे संगमर्मरी कडे
पावसाळ्या रात्रींतील आषाढघनांचीं काजळी स्वप्नें !
गवती घागरा गिरगिरतो आहे
क्षितिजाचा ढोल घुमतो आहे
त्यांच्या शंखांच्या कुंडलांत सागराची गाज आहे
पोवळ्याच्या माळांत सांडलेलें सूर्याचें ओज आहे
आणि त्या कटोहाला फुटला आहे माणसाचा डोळा—
काळ्या पांढऱ्या कवडीसारखा
पाण्यानं भरलेला !
चकमक झडली आहे मातीच्या मनांत.

महंमदाचा उंट
तरवारीचीं पानें चावीत इथे आला
तान्हेलाच परत गेला
त्याच्या पाठीवरून उडालेलीं कुराणाचीं पानें
सागाच्या अरण्याने खाऊन टाकलीं
ख्रिस्ताचें कोकरूंही इथे चरत आलें
तागडी-तरवारीच्या भांडणांत
क्रूस विसरून गेलें
गंगेचे हात नि हिमालयाची साउली घेऊन
एक हाडकुळा माणूसही इथे आला
आणि इथल्या मातींत त्याने प्रथम ज्योत उजळली
सत्याची शांत ज्योत—सत्याग्रही
(तप्त वाहत्या वाळवंटाचा जाळ हिमालयाच्या मनांत उमटला)
गंगा-यमुनेच्या तीरावर

दक्षिण समुद्राच्या काठावर
तोच प्रकाश पसरला आहे
चकमक झडली आहे मातीच्या मनांत.

सात समुद्रांच्या पलीकडे
आयनेदार 'इस्पाती' शब्दांच्या गगनवेधी महालांत
जल्पितांचे भुइनळे उडविणाऱ्या
आतषबाज खेळियांनो,
या मातीकडे पहा
वॉशिंग्टनने उपसलेल्या स्वातंत्र्यखड्गाचें पाणी
या इथे पणास लागणार आहे
लिंकनची समतेची शपथ
या कांगोच्या काठावर पूर्ण व्हायची आहे
महात्माजींची जखमी सायंप्रार्थना
प्राणाहून मोठी होऊन
याच मातींतून सूर्यमंडलाचा भेद करणार आहे!
चकमक झडली आहे मातीच्या मनांत!

मुंबई, १९-९-६०

# गोड आंबट उगीर

ओल्या अभ्रकाचे ढग
रसरसले तेजांत
ओसरल्या पावसाची
ओल अजूनी उन्हांत

हिरवट लवणांत
वाट शेंदरी वळली
पुढे धावे ऊन, मागे
नीलपाटल साऊली

तिथे जांभळीखालती
दुपारीं तूं भेटलीस
ओल्या पात्रीं विंबलेलें
गोड ऊन हासलीस

ओला शेव पावसानं
ओला खांदा, चोळी तंग
मारी लहरा ज्वानीच्या
त्यांत तुझा गोरा रंग

तुझ्या ओल्या गालीं ओठीं
स्मित लाजरें उठलें
ऊन कालवतां त्यांत
खळें चंद्रम्याने केलें

शिराळाच्या मनांतलें
झुरेंबावरें तूं गीत
ओचेपदर खोवून
कां ग आलीस भिजत ?

माझ्या हातीं ओच्यांतील
हळू जांभळें दिलींस
जळीं सोनेरी मासळी
तशी निघूनी गेलीस

ओंजळींत तीं अवोल
काळीं जांभळें टपोर
क्षणें रात्रींचीं आपुल्या
गूढ गहन मदिर

कांही किरमिजी हासे
सांद्र जांभळी दुपार
कुजवुजे अन् जांभूळ
गोड आंबट उगीर.

औरंगाबाद, ७-९-५२

# ओले हिरवे दिवस

गिरिशिखरांवरूनी
सोगे सुटले ढगांचे
ओले हिरवे दिवस
येती जाती श्रावणाचे

मिटे फुले डोंगरांत
फूल ऊन-सावल्यांचें
स्वप्न दिवसाच्या डोळां
तरळतें चांदण्याचें

ओल्या चिंब अवकाशीं
आर्त नाद पावश्याचा
पान फूल होऊं पाहे
कण कण मृत्तिकेचा

विष्णुकांतीच्या फुलांच्या
पसरल्या निळ्या राशी
सहस्राक्ष आंथरितो
नेत्र धरेच्या पायांशीं

गवताच्या पात्यापरी
भिजलेलें माझें मन
इंद्रधनुष्याशीं नातें
जोडी उन्मन होऊन

औरंगाबाद, ऑगस्ट १९५२

# स्पर्शे केसाळ काळोख

काठाकाठानं गावाच्या
नदी वाहते वाकडी
रानराईला हिरव्या
नथ मोत्यांची फाकडी

लाल कौलारांवरुन
पानें हिरवीं हुंगीत
धूर आळसावलेला
चढे लोळत घुमत

उष्ण आतुर रेशमी
धरणीचा निळा श्वास
हिमें उलल्या नभाच्या
शिवे सांज-कपोलांस

सरे कापूस-वेचणी
हसे बोंड एखादेंच
वेचतांना गुंतलेल्या
शोधी पदराचे पेच

गुरें गेलीं घरोघर
खूण खुरांची पांदींत
चमचमती काजवे
दोन्ही बाजूंनी फांदींत

पारावरती मुंजाच्या
दीप जळतो विषण्ण
रेषा आपुल्याच वाची
वरी पिंपळाचें पान

स्पर्शे केसाळ काळोख
हळू येऊन मागून
वाट निर्जन भयाने
पडे लाकूड होऊन

नागपूर, २८-२-५४

# मिठी

दूर टिटवीची साद
वाऱ्यामनीं भरे काटा
होते पुळणी मनाची
हुरड्यास येती लाटा

क्षितिजाशीं पाणरेघ
निळी पाऱ्याची हालते
कुंकुमाचें सूर्यबिंब
त्यांत भिजतें, विरतें

संथ लाटांत पायांशीं
तेंच बिंब उमटतें
रिते जन्म सांधणारें
स्वप्न त्यांत उमलतें

हातीं हात गुंफोनिया
उभे आपण पुलिनीं
तळीं सरकते वाळू
मूक लाटांच्या ओठींनी

तुझ्या गुंफिल्या बोटांचे
सळ उठले वाऱ्यांत
गीत माझें थरकतें
ओल्या रेतीच्या ओठांत

लाट पुसे सागरास
फुटतांना फेनखुळी
वेढुनीहि पृथ्वी कां रे
मिठी रितीच राहिली !

मुंबई, २९-२-३०

# गोष्ट सांगतों एक फुलाची

ऐक फुला, तुज
गोष्ट सांगतों एक फुलाची
शुभ्र कापऱ्या स्पर्शदलाची
केशर-देठीं उसासणाऱ्या गंधव्यथांची
एक क्षणाच्या दवबिंदूच्या विलोर दर्पणिं
झिलमिळणाऱ्या विघळणाऱ्या
दुखऱ्या कालातीत स्मिताची
ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
झुऱ्याबावऱ्या एक फुलाची

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों :
रेशिम-धूसर पहाट होती
वाऱ्यावर हलकासा काटा
गवतावरती दवबिंदूंतुनि
नक्षत्रांच्या हजार वाटा—स्वप्नभूमिच्या
कोण उभें या फुलवाटेवर ?
सावकार-कन्यका गोरटी
फुलांमधे ती फूलच केवळ
कळीच उठली देह धरोनी निशिगंधाची
उषेंत न्हाउनि ती ओलेती किनाऱ्यास सावरी तनूला
उडतां पवनीं
आपुल्याच पदरास दचकते
निळ्या रेशमी विरळ सळसळिंत
चांदकेवडा तिच्या तनूचा हलुच मदालस फुले, शहारे
झोकच न्यारा
परि हलक्या वारीक कटीचा

लववायाला धनुष फुलांचें
त्या मदनानें
इथे शिकावें !
वुंद छातिचे दोन कबुतर
अथिर आर्त थरथरत्या उरिंचे
शोधूं खोपा
निळ्या नभामधि उडूं पाहती
पदरांतच फडफडुनि राहती
अशी उभी ती
स्वप्न घेऊनी आकाशाचें व्याकुळ नेत्रीं
जिथे पलकछायांत झोपले
चंद्र-सूर्य जे अजुनी अनुदित

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
एक फुलाची अन् सूर्याची
अनुदित ?—छे, तो सूर्यदेवची येतो इकडे
रथ किरणांचा पैल सोडुनी
राईवर सोन्याचें पाणी
लाख फुलांचा शब्द फुटतसे मुक्या डहाळिस
परंतु वितळे
सांगायाचें तिच्या मनींचें हृदयाच्या धडकींत धुक्यापरि
फक्त पापणिंत पाणी बनुनी
चढे प्रतीक्षा जन्मभराची
एक थेंब इवलासा झरता—
थेंबांतचि त्या सूर्य बिंबला
नभाएवढा.

नभाएवढें सूर्य हासला बघुनि तिजकडे
हास्य पेटतें पेटवणारें

जरतारी तारांपरि शिरलें
नसानसांतुनि तिचिया जाळत
हवीहवीशी—तरिहि जाळती—आग अलोलिक अनंत युगिंची
मान टाकुनी
कळीपरी ती लवे पुटपुटत,
"असेंच देवा, मला जवळ घ्या
खुडा कळी ही जन्मजन्मिंच्या देठापासुनि."

फिरुनि एकदा सूर्य हासला
आकाशामधि शब्दकवडसे
"स्पर्शीं माझ्या दाहच केवळ
मिठींत माझ्या आग जागती
रात्र न माझ्या शयनमंदिरीं, गूढ स्वप्नमयि
फेर धरी जी दिव्याभोवती
चिरप्रवासी मी काळाच्या ज्वलत् क्षणांचा
अस्मितेचिया आगीमध्ये आपुल्याच मी संतत जळतों
पुन्हा जन्मतों
याच अहंतेमधुनि जाळत्या
बनुनि हिरण्मय क्षण मी उद्याचा
या अवकाशीं दोन क्षणांच्या !—
स्थान प्रीतिचें तुझें कोठलें
सांग प्रीतिच्या फुला, एकदा."

"या अवकाशीं पानोपानीं
दवबिंदूंचे लाख आयने
त्या आयनेमहालांत साजणा,
प्रीत नांदते—क्षण जळले जरि—
त्या प्रीतीची करा पूर्तता
जळत्या चुंबन-क्षणांत एका

स्वप्नकळी ही फुलवा, फुलवा
कुसकुरुनी या देहपाकळ्या
सुगंधापरी मला जवळ घ्या
मला जवळ घ्या.”

किरणाच्या तेजाळ बाहुचा
तिच्या कटीला पडला विळखा
दबत शहारे तनु अंगांगीं
ऊबदार त्या घट्ट मिठीमधि
ऊष्ण ओलसर मिटत्या नयनीं
उरांत गुदमरत्या श्वासांतुनि
प्रबंध फुलले निःश्वासाचे, खोल प्रीतिचे
अधरीं दाहक स्पर्शठसा तो
निर्मि खोलवर लहरी लहरी
पाऱ्यापरि सुख शरिरीं धावे
फुलतें शतदल कमल नाभिमधि
रक्तामधुनी फुटती लाटा
वेढुनि आत्मा
सुखद गुदगुल्यांपरी पसरती
चंद्रकोर मग तंद्राजड डोळ्यांत उगवते
अमृत स्रवते मनामनांतुनि
जरी गढुळली
क्लांत धुक्याची
विभावरी बावरी त्वचेची
त्या आलिंगनिं
बाला होई
दुपार पांडुर सुस्त विवस्त्रा
धगधगीत बेहोष तृप्तपणिं

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
दुपारची बेहोषपणाची
दुपार कलली ती भोगालस
आल्या रात्री गहिऱ्या बहिऱ्या
मुखिं तारांचें गुपीत जळतें
सुहुर तमाची तरिही ओठीं
काळ्या मेघीं सांज विघळे आशेपरि त्या
तिच्या मनींच्या
थकली गळली वाट पाहुनी
सूर्य फिरोनी नाही आला
क्षण फुलली हुंदक्यांत गद्गद
मुखीं कळ्यांच्या हसूं फाटलें जीर्ण वस्त्रसें
फुटले दवबिंदूंचे अयने
राखी हसला निष्ठुर पद्दा
त्या गवताच्या दूर मुडपल्या मानांवरुनी
क्षितिजाच्याही पैल—पलिकडे
मेघडंवरी कुंजामधुनी
उषागौर कंठांत कुणाच्या
किरणांचा केसाळ बाहु तो?
होय, तोच तो
डसला होता तिला एकदा
व्रण पुष्पाचा
रेखुनि अधरीं
श्वास तिचा गुदमरला आजहि
त्या बाहूविण
चिरीत गेलें चरचर कांही
शतदल कमला नाभीमधल्या
सलतें तिजला तिचें नग्नपण—खोल कुठे तरि
असुनी वसनें अंगावरती

उठुनि जाय तो डाव उधळुनी
भिंग खेळतां फुटून गेलें
कशास असलें वंचित जीवन ?
हरपे मनिंची मनिंच लावणी
चढतां चढतां
मधेच तुटली तार झऱ्याची
मुकें तुणतुणें रसरंगाचें
नभांत फुटला डफ चंद्राचा
तोडे चुकले, चाळ विखुरले घुंगर घुंगर क्षणाक्षणाचे
पळांपळांतुन अग्न पेटला
उडी घेइ ती
अशा पळांची चिता पेटवुन

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
एक फुलाच्या दग्ध चितेची
राखेमधुनी
तिच्या उगवलें
हिरवें हिरवें झाड सानुलें
फुलतें रात्रीं लाख फुलांनी
केशरदेठीं तो रक्ताचा रंग झाकळे
अन् अश्रूंच्या शुभ्र पाकळ्या
देठिं वेदना पाकळ्यांत हसुं
हीं नवलाचीं फुलें आगळीं
नक्षत्रांपरि तमीं झळकती
सांगतात वाऱ्याच्या कानीं
प्रेमाची आपुली कहाणी
हसत रात्रभर
परी पहाटे सूर्य उगवतां
शब्द मुके भयभीत फुलांमधि

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

कांपे थरथर उभें झाड तें
अश्रु गाळितें
उतरुनिया शृंगार फुलांचा
उदासवाणें बघे दिशांतुनि
देत हुंदके देठीं देठीं
कुजवुज हिरवी पानोपानीं
"प्राजक्ता ही
फुलें तळीं हीं हिच्या जिवाचीं
झडलीं रातिंत."

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
एक फुलाची—प्राजक्ताची
झडलेल्या घाबऱ्या दळांची
पहाटरात्रीं
दाराशीं प्राजक्त बहरतो
वेचुनि दहिवर चांदण्यांतलें—
माझ्या—
तेव्हा
माझ्याही मनिं
फुले एक प्राजक्त रात्रभर
फुलीं डवरल्या डहाळ्या त्याच्या
पसरति माझ्या शिराशिरांतुनि
हलती वाऱ्याच्या झुळकांनी
टपटप झरते
गात्रीं गात्रीं
रास फुलांची
परि बघतां मी आंत वाकुनी
उरती डोळां फक्त आसवें—
आठवून मग

ऐक फुला, तुज
गोष्ट सांगतों एक फुलाची
शुभ्र कापऱ्या स्पर्शदलांची
केशरदेठीं उसासणाऱ्या गंधव्यथांची
एक क्षणाच्या बिलोर दर्पणिं
झिळमिळणाऱ्या विघळणाऱ्या
दुखऱ्या कालातीत स्मिताची
ऐक फुला, तुज गोष्ट सांगतों
एक फुलाची
प्राजक्ताची.

मुंबई, ७-८-६०

## जाग आली पावसानं

मध्यरात्रीं अवचित जाग आली पावसानं
घनगर्जित लोळत दूर जाय क्षितिजानं
थेंब वर्षती टपोर
घरांवर दारांवर
छेडित ये जलधार
आर्त चांदणी केदार शहारतें पानपान
जाग आली पावसानं

मघा नक्षत्र वेंघून वीज करीं वाकवीत
वारावादळ पिऊन भाद्रपद ये झिंगत
निळी मख्मल मेघांची
शुभ्र फुलें कुटजांचीं
यक्षगीतें विरहाचीं
तुडवीत भाद्रपद नाचे धारांत बेभान
जाग आली पावसानं

नागमोड सोनसळी वीज लखाखे पुढून
सुप्त पानें उजळतां झाड उभें भांब्रावून
असें माझिया मनांत
कोण ठाकलें भिजत
स्वप्न तलम निद्रेंत
रचूं जातां तिचें गीत झोप मोडे वादळानं
जाग आली पावसानं

विजा तिच्या हासण्यांत लोळे घन पदरांत.
धुंद उषा पावसाळी जांभई दे लोचनांत
सावळत्या चांदण्यांत
वीज जाय लखाखत
तसें माझिया स्वप्नांत
येई जाई कुणी तरी निळ्या निद्रेच्या काठानं
जाग आली पावसानं.

औरंगाबाद, २५-९-५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५११८ वि: काव्य
१९६२ नों दि: १८/३/७१

## वर

ओठंगे आकाश
माझ्या गवाक्षास
बेड्यांनी भूमीस
खिळतां मी

शिंपांच्या संपुटीं
सागर गर्जती
चतुर ऐकती
कान माझे

काजव्याच्या पोटीं
सूर्य झळझळे
पाहतात डोळे
मिटूनीहि

माझ्या जखमांना
वर एवढा दे
जिव्हाळी लागू दे
अमृताची.

मुंबई, १९-९-६०

## बांग

एका तालांत एका ठेक्यांत
हजारों पाय वाजत येतात
हवेंत हजारों निशाणें फडकूं लागतात
दिशांत घुमतात कोटि कोटि कंठांचे नाद
मी म्हणतों,
ही नव्या जगाची ललकार आहे
युगांतराची प्रभातफेरी चालू आहे
पहा, पहा हा नव्या पर्वाचा पुण्योदय
नव्या युगाचा नवा प्रकाश
करा, नव्या युगाचा जयजयकार करा.
माझें हें आवाहन ऐकून
रस्त्यावरील पडक्या भिंतीची खुजी सावली
पचकन थुंकते, म्हणते—
आज सकाळीं
मागच्या खुराड्यांत
सुरीच्या सावलींत फिरणारा
कसायाचा कोंबडा
अशीच बांग देत होता
दिवस उजाडल्याची
नव्या पहांटेची !
काय तुमच्याही डोळ्यापुढे कोंबडयाचीं पिसें उडूं लागलींत ?

मुंबई, २८-९-६०

# चांदणें हें डहुळेल

ऊन रेशमी पडतां
डोळे फुलाचे दिपले
बिंब दवाच्या दर्पणीं
सात जन्मांचें पाहिलें

सात जन्मींचें संचित
तुझ्या हास्यांत माळलें
जपतात दुःख पोटीं
काळीं डोळ्यांचीं वर्तुळें

साहिल्यास साऱ्या व्यथा
ज्योतीपरी तूं कापत
तेवलीस रात्रभर
माझ्या मातीच्या घरांत.

झोप आता, नको बोलूं
फूलमिटूं झाले डोळे
अर्थ जागवितां ओठीं
शब्द माझे पेंगुळले

आता बोलूं नको कांही
निळाई ती गढुळेल
निःश्वासहि नको खिन्न
चांदणें हें डहुळेल

मुंबई, १९-२-६०

# आरसा हा नको नेऊं

आरसा हा नको नेऊं

ठेव जिंदगी गहाण
सुखें घेई पंचप्राण
मागूं नको भिंग पण
क्षण बिलोरी सुखाचा एवढा हा नको नेऊं
आरसा हा नको नेऊं

दिसां हास्याच्या धुळींत
रात्रीं अश्रूंच्या धगींत
स्वातीविण पापण्यांत
जपलेला दिठींतिल माझा मोती नको घेऊं
आरसा हा नको नेऊं

पहिली ती भेट—प्रीत
बिंबली या दर्पणांत
तिच्या फुलून स्मितांत
काठीं रात्रींच्या तरंगे तोच क्षण मेघमऊ
आरसा हा नको नेऊं

देत जांभई हसत
उभी केस विंचरीत
काया पुनवेची श्रांत
कलणाऱ्या चांदण्यांत पिके हुरमुजी गहू
आरसा हा नको नेऊं

सखीविण आरशांत
आज पुनवते रात
हसूं फुटे कुंतलांत
प्रतिबिंबीं जगण्याचें माझें वेड नको नेऊं
आरसा हा नको नेऊं

८-३-६१

# ओल चांदण्याचा

रित्या क्षणापरी वाके चंद्रबिंब डोंगराच्या काठीं
वाळली रात्रीची ओल चांदण्याची धरणीच्या ओठीं
धुकें घरांवर हुंगतें सुगंध साखरझोपेचा
उडतां पाखरू गवाक्षीं शहारा सुटल्या मिठीचा
ढगांच्या काठांशीं धुक्याच्या लाटांशीं चांदणें फेसळे
तिथेच उषेचा सोनेरी नारंगी प्रकाश हिसळे
अशा या प्रकाशीं नहात उभी तूं पुढे सौधावर
मला निरखून रोखिशी हसून दृष्टि नभावर
दिवा झाडाखाली तेवते ढगांत चांदणी शुक्राची
जेप खूणगाठ ज्योतीच्या धाग्याची रेशमी रात्रीची
स्वप्नीं भारावुन दोघांच्या व्याकुळ भिडल्या नजरा
मुक्त मनें झालीं तुटला क्षणांत जन्माचा पिंजरा
पुंजाळतों तुझा चाफेगौर स्पर्श उषेच्या रंगांत
ओंठाचिये देठीं खुडिलेले शब्द पिकती मौनांत
भरीतसे दोरा आपुल्या स्वप्नांना झाडांमधी रात
उसवे शिवण फाटकेपणाच सकाळपणांत
रित्या क्षणापरी वाके चंद्रबिंब डोंगराच्या काठीं
वाळली रात्रीची ओल चांदण्याची धरणीच्या ओठीं

३०-३-६१

## यक्ष

माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायांत फिरत आहे झुरत आहे
निळा रामगिरि खिरला आहे छायांचें रेशिम वठलें आहे
रडून थकल्या डोळ्यासारखें पुण्यसरोवर आटलें आहे
शुभ्र हास्य तें कुटजफुलांचें मळक्या सावल्यांत विटलें आहे
बगळ्यांची माळ तुटली आहे प्रियेचें चित्र पुसलें आहे
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायांत फिरत आहे झुरत आहे

वर्षभराचा शाप त्याचा युगें सरलीं तरी सरला नाही
मेघाचाही अजून हिरवा घाव विजेचा भरला नाही
फुलें जिथे सुकत नाहीत जिथे चांदणें मावळत नाही
आनंदावाचून नेत्रांमधून जिथे अश्रु झिरपत नाही
गोऱ्या लाजऱ्या गुलालमुठींनी शय्यादीप जिथे विझत नाही
रत्नांच्या दीपांचा अम्लान संध्येचा प्रियेचा तो देश दिसत नाही
थिजून पर्वत झाला त्याचा ! शिवाचें हास्य राहिलें नाही
स्वप्नभूमि ती लपली क्षितिजीं दिशांचें बंधन तुटलें नाही
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायांत फिरत आहे झुरत आहे

उंबऱ्यावरती दिनगणनेची फुलांची रास सुकली आहे
मोर नाचतो परी विरहिणी धरतांना ताल चुकली आहे
अश्रूंत तिचा स्वर भिजला आहे विणेची तार तुटली आहे
गळ्यांत गाणें उरलें नाही तनूची चंद्रकोर झरली आहे
स्वप्नसखीला अलकेमधल्या प्रतीक्षेचा शाप जडला आहे
चिरविरहाचा विफल प्रीतिचा यक्षाला वर लाभला आहे

त्याच्या नशीबीं फुलांच्या प्याल्यांत कडू अश्रूंचा घोट आहे
डोळ्यांत आशा, दिशांत धुकें पायाखाली मोडली वाट आहे
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायांत फिरत आहे झुरत आहे

वर्धा, २२-९-१९५८

## नागासाकीचे अंध

नागासाकीचे आम्ही दीन अंध
चाललों पथाने
कबंध जयाचे मानवतेच्या
आम्ही जयघोष विश्वशांतीचे रक्तलांछित
शांतिनगरीचे आम्ही प्रजाजन
स्मशानवासी
निरपराध बळी संहाराचे !

—तेव्हा
अश्रु पुसाया निरपराधांचे
ईश्वरापाशीहि नव्हता पदर
आम्ही वाळलेले डाग
धरणीच्या गालीं

चाचपडत ठेचाळत आम्ही आमच्या शवांना
चाललों पथीं
विज्ञानमनींच्या विफल आशांच्या
दग्ध छायांपरी
समोर उभें प्रार्थनामंदिर
हसत भयाण लाजिरवाणें
पडक्या भिंतीच्या जळक्या खिंडारीं
निज लक्तरांनी
प्रभुकृपेची लाज झाकूं बघे !
पडली पुढे कोसळोनी घंटा
शून्याला साद घालून थकली
आणखी हें झाड !

भरीत राख उषेच्या ओठींत
हसे वेड्यापरी रस्त्याच्या कडेला
वाकलें आकाश
हुंदका बनून
—आणि हीं माणसें घरीं, दारीं, पथीं
बाजारहाटीं
संज्ञाविहीन
मांसाचे गोळे बनून फिरती
चाटीत क्षतें कण्हत क्रंदत
स्मृति हारवून ज्योत मालवून
मनाची युगाची !

त्या दिनीं
प्रकाश पाहिला निळाजांभळा
येतांना वर क्षितिज चिरीत
स्फोट मागोमाग भूगर्भातुनी
धरेचीं आतडीं कापीत धावला
उठली धूळ
प्राशाया तेजाचें तेजबपाणी निळेंजांभळें;
परंतु स्वयेंच
पेटली धूळ
जळत जाळीत स्थिरचरांना
क्षणीं काळ्याकुट्ट होती दाही दिशा
गोठून उभे धरणी आकाश
राखुंडी बनून
—असा पाहिला प्रकाश अंबरीं
जाहलों आंधळे तेव्हापासोनी
आंधळे न झालों आम्हीच तेवढे
फुलांचे डोळे

क्षणांचे लोचन
सारेच आंधळे नागासाकीचे!

अंधतमांत
तरीहि आम्हांस धुक्यांत दूर
सत्य दिसे,
लवे विद्युत्‌रेखेपरी
धूसर रात्रीं हिमप्रलयींच्या
विज्ञानमत्त मानवांनो, पहा
बघा, पुजाऱ्यांनो संहारशक्तीच्या,
भिंगांमधून नक्षत्रवेधी दूरदर्शिनीच्या
येई धडधडा
जीवनरथीं विनाश बसून!

मानव झालासे घोर रात्रिंचर
कल्माषपाद!
हिंडे किंचाळत निज अंतरांत
अभिमंत्रुनी शापाचें उदक
विज्ञानी मानव
जाळाया सजला त्या करुणामय मानवतेला
निज हृदयींच्या;
परी बावरून
सोडिलें तयाने शापाचें उदक
आपुल्याच पायीं
स्वशापें दग्ध क्षतें भगांकित जळत्या चरणीं
व्यथेने पीडित
कल्माषपाद विज्ञानी मानव
आपुल्याच ध्वस्त भयाण अंतरीं
हिंडतो क्रंदत!

चालतां पथें
पाहतों हें दूर
आम्ही दीन अंध नागासाकीचे

औरंगाबाद, १९५२

## स्वप्न रात्र ही सांभाळ

रात थंडीची सरती
विरे पहाटधुक्यांत
हारवल्या कला शोधी
क्षयी चंद्रिका ढगांत

लावी पचम विकल
असा झोपेंत कोकिळा
रसगंधाच्या स्वप्नांत
तिला काटाच बोचला

हिर्व्या मौनास झाडांच्या
पाखरांचा कंठ फुटे
निळ्या नभाच्या ओढीनें
सुख खोप्याचें उस्कटे

होई लाल हासतांना
देठीं देठीं पारिजात
व्यथा झाकळे अशीच
तुझ्या हासऱ्या ओठांत

निघे सोडून मी तुझा
चंदनाचा उंबरठा
ओढितात मज दूर
लांब काळ्या काळ्या वाटा

वाटांचा मी बांधलेला
नाही सुटायचे पीळ
तुझ्या डोळां दवांतून
स्वप्न रात्र ही सांभाळ.

नागपूर, ३-११-५६

## दीपछाया

करिशी कां दुःख
होतां ताटातुटी
विलगतां, ओठीं
 स्फुरे शब्द

वेगळाल्या तारा
करिती झंकार
निर्मितें अंतर
 नादब्रह्म

तुझें तत्त्वज्ञान
सांग पाषाणास
मुक्ति पतंगास
 दीपछाया.

मुंबई, १९-९-६०

## ही दुपार

धगधगीत ही दुपार
नाही हिज अंत पार
वैशाखी हुंकारचि
धगधगीत ही दुपार

तापुनिया धुरकटलें
आहलुनी चुरगळलें
केळीचें पान निळें
कडकडतें, फडफडतें फाटायापूर्वी जणु
शुभ्र लोंबत्या ढगांत
गगन असें डोक्यावर
धगधगीत ही दुपार

गगन निळें तप्त शिसें
वितळुनीहि नच वितळे
साउलीहि त्यांत जळे
गळलेल्या जळलेल्या पानांच्या राशींमधि
तरुतरुच्या हृदयांतील
छायांचें गार स्वप्न करपुनिया लोळतसे
धगधगीत ही दुपार

मूक किती
किति नीरव
धगधगीत ही दुपार
छे छे, या आगीमधि नीरवताही उकळे
या पडक्या खिंडारीं

त्या निर्जन बाजारीं
कढ तीचे सर्व मुके
लव सुकल्या पानांची
प्रातःस्मित सुमनांतिल
क्षणोक्षणीं सुकणारा फळांतील रसोद्रेक
नीरवतेमधि वितळे
या दुपारच्या उन्हांत
धूमिल धूसर दिशांत
धगधगतो मातीचा चिरविषाद
धगधगीत ही दुपार

नीरवता ही मूर्च्छा धरणीला जडलेली
चाळवली
वाऱ्याच्या झुळुकीने
धूळ दचकुनी उठली, वाऱ्यासह अन् गेली
फूत्कारुन रस्त्यावर
हासत ती वेड्यापरि निज आंतर ज्वलनाला
स्तब्ध सर्व, सर्व शांत
खिन्न, क्षुण्ण अन् उदास
एकाकी ही दुपार
एकांतचि धगधगीत
किति अपार किति अथांग
दूर परी खिंडारीं
शुष्क वृक्षशाखेवरि हुंकारे व्याकळुनी
एकटा सुतार पक्षि
'टक् टक् टक्'
कर्कश रव तो भीषण
चिरित जाइ बाणापरि
त्या दुपारच्या क्षणांस

तप्त दग्ध गहनतेस
अन् नीरव अनंतास
स्थलकाला कोरितसे 'टक्टक्' रव तो भयाण
धगधगीत ही दुपार

रणरणत्या रस्त्यावर
इवलेसे अनवाणी पाय कुणाचे पडती
पोर नागवें-उघडें रडत पळे
पदर धरुनि आईचा
सान पाय भाजतात, पोळतात
मातीने वाळतात
गळणारे अश्रु गालिं;
करुणेच्या जखमेवरि
धरि खपली अतुट घृणा !
किंकाटे झाडावर क्रूर घार
आईचें हृदय वळे
फाडुनिया पांघरतां पदर करें
बांधि पाय बाळाचे
नच उरला पदर तिला—
लाज नभाची उघडी !
धगधगीत ही दुपार

सावरून पान-फुलें
घाईने कोण निघे ?
नागिण ?—छे—
माळिण ती हो गव्हळी
लवत निघे शेलाटी
अडवी चिरि कुंकाची निटिलावर ओलावे
कानशिलांवरुनि घाम डवरुनि ये सोनेरी

गोल नाचऱ्या नयनीं
ये उसासुनी तहान
अधरीं स्मित रात्रीचें दवबिंदू प्यालेलें
तिरपेने आहळलें
पाटींतिल पुष्पापरि
चरणचाल चपळ निघे
केतकिचें कणिस डुले
गोल छातिचा उभार तटतटल्या चोळींतिल
भिजलेल्या काठांतुनि डोकावुनि सांगतसे
सूर्याला आकाशीं,
"तूं खुशाल आग ओक
बघ शीतल चंद्रम हा उरिं माझ्या
अमृत नित स्रवत असे
धगधगीत जरि दुपार !"

उठला बाजार सर्व
अन् ओक्या ओव्यावर
धनतृष्णा एकाकी बसुनि खिन्न
श्वानापरि चाटितसे
आपुलेच शुष्क ओठ
छायांतुनि पेंगतसे निंब एकटा वरती
विस्फारुनि नेत्र बघे दाजीबा सावलींत
माल पुढे पडलेला
बाजारीं नच विकला
विकला नच माल जरी नेऊं मी काय घरीं ?
सांजेचीं काकणेंहि
वाजतात उंबऱ्यांत
दीप कण्हे खोपटांत
जाळ फुरफुरे चुलींत

परि रिताच वरति तवा तो भकास
वाट बघे भाकरिची
फिरति मुलें कोपऱ्यांत
घार फिरे डोक्यावर
चोळुनिया नेत्र बघे दाजीबा
विस्फारित त्या नेत्रीं अग्निरेघ धगधगती
क्षितिजापर्यंत जाय
कापुनी दुपारउन्हें !
धगधगीत ही दुपार

धगधगीत ही दुपार
खोल मनीं
जतन करी
चटके ते अनवाणी पायांचे
गरिबांच्या लज्जेचें जळ धरिते अंजुळींत
अमृतही हळु टिपिते माळिणिच्या हृदयांतिल
दाजीच्या व्यथित मनीं
रंगविते आशेने बाजारहि पुढिल नवा
जरि विखार
तरिहि मधुर
धगधगत्या अंतरांत
ज्वालामय स्पंदनांत
दग्ध तिच्या त्या करांत
पश्चिमेस क्षितिजावर—दूर दूर
मृदु गुलाबकलिकेपरि
मधु रसाळ द्राक्षापरि
अनाघ्रात अधरापरि आतुरपणिं थरथरती
अन् विरक्त भजनापरि
किणकिणती झंकरती

क्षीण एकतारींतुनि
दीपांतुनि थरथरती
गोठ्यांतुनि हंबरती
माउलिमनिं रुमझुमती
करुणामय ओवीपरि
सांज अशी
सजे, फुले तिज हातीं
धगधगीत जरि दुपार

औरंगाबाद, १७-५-५१

## कांही काळ्या निळ्या रेषा

कांही काळ्यानिळ्या रेषा
उमटल्या कागदांत
रेघोट्याच शाईच्या त्या
जीव कापीत जातात

तुझ्या नकाराची भाषा
जाळ बने अक्षरांत
आग जशी काटक्यांत
अर्थ जळती शब्दांत

तुझ्या जाळिल्या पत्रांची
राख वाऱ्यांत उडते
सखे, काळ्या रेषांनी त्या
तरी अंतर जळतें

अश्रु नेत्रींचे देऊन
तेज स्मिताचें पाजून
फुलविलें भावफूल
जायचें का आहळून !

कंठांतून कोकिळेच्या
तप्त सूर वितळले
कां ग हासतां हासतां
रान पिवळें पडलें ?

चंद्रकराच्या स्पर्शाने
कापे ओठ क्षितिजाचा
असा जळता कापूर
नको करू चांदण्याचा !

नागपूर, १९५६

# मजला ठाउक : तुलाहि माहित

मजला ठाऊक
तुलाहि माहित
आकाशाचें अपुलें नातें
काहुरकाळ्या पावससरिच्या
विद्युत्-भोगी आर्द्र क्षणाचें
आकाशाचें अपुलें नातें
मजला ठाऊक, तुलाहि माहित

मजला ठाउक, तुलाहि माहित
सखे, परी त्या क्षणांत एका
मातीच्या मनिं
नक्षत्रांची फुले डहाळी
काळ्या करड्या निळ्या ढगांना
येई ओला गंध मातिचा
कसें घडे हें ?
थांब सांगतों
— लाजुं नको पण —
चांदण्यांत न्हालेल्या रात्रिस
सुगंध येतो तुझ्या तनूचा
मजला ठाउक, तुलाहि माहित

मजला ठाउक, तुलाहि माहित
क्षण तो सरतो
सरे न नातें
उरांत लागे खोल जिभाळी
तेव्हा—त्या क्षणिं

निःशब्दाला येइ शब्दपण
अर्थ झगटतो शून्य नभाला
सरतें, गळतें
सूर्यमुखींचें
कनकपात्र लखलखतें, वंचक
लाख चंद्र अन् मिटती, फुलती
नखाएवढ्या जिभाळींतुनी
आणि उसवत्या आभाळाला
व्यथा आपुली भरते दोरा
मजला ठाउक, तुलाहि माहित

मजला ठाउक तुलाहि माहित
प्रतीक्षेंत त्या एक क्षणाच्या
ग्रीष्मि जन्मभर तपत रहावें
वेदनेस उरिं जपत रहावें
जळत डसत
एकांतिं स्वताला
या धरणीचें आकाशाचें देणें द्यावें
मजला ठाउक, तुलाहि माहित
तरिही डोळां येति आसवें
पुसूं नको तीं
पुसूं नको तीं
आकाशाचें अपुलें नातें
मजला ठाउक, तुलाहि माहित

नागपूर, ८-११-५९

## ठिपके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ६५११८ वि: का१०४
स्थळ ११६२ नों दि: १८।३।६१

झडींत भिजुनी
कुरकुरणाऱ्या म्हातारीपरि
रात किरकिरे बाहिर काळी;
घुसळुनी जाई रस्ते रानें
सुसाट वारा
सरसर धारा
जाती नाचत
पानापानावरी तरूंच्या
भिजलेला अंधार शहारुन
सडसड झाडी
अजस्र अपुली तनु केसाळी
कण्हे शून्य एकांत रात्रिचा

तनु माझी तापली पोळते
उठती त्यांतुन
ओल्या अन् धगधगत्या वाफा
लाल जांभळे पिवळे काळे
मोरपंखि किति
ठिपके धावति
जळजळत्या मम डोळ्यापुढुनी
हलकें होउन
शरीर सारें
जाइ तरंगत हवेंत वरवर
पिसांपरी—पण
तोंच स्पर्शतें
काट्यापरि? छे,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १२०८०

मृदुल फुलांच्या पाकळ्यांपरी ?
की श्वासापरि थंड कुणाच्या ?
फिरतें कांही
तीक्ष्ण सुरीपरि काळजांतुनी
आदळते तनु खाली अवचित
मी बावरुनी दचकुनि उघडीं
जडावलेले कष्टी डोळे

मेजावरती
उंच वाढतो
उभा उभा काचेचा प्याला
फिरुनी होतो खुजा क्षणामधि
मोसंबीं तीं दोन पलिकडे
बघति न्याहळुनि
रसरशीत सोनेरी कांती
परस्परांची
सुस्त क्षणांच्या मुखीं उगीचच
खट्टें मिठ्ठें सुटतें पाणी
सफरचंद तो हिरवा शेंदरि
आपल्याच रंगांत चमकतो
बिलोरकांती
दिवा जवळचा त्यांत वाकुनी
उगिच पाहतो बिंब आपुलें
आणि दचकतो
जाणवतां निज एकाकीपण

तोंच कोठुनी
पतंग येई
फेर धरी तो दिव्याभोवती

झिंगुनिया आपुल्याच वेगें
त्या वेगामधि
फिरत उमटतें
धगधगीत सोन्याचें वर्तुळ
खळें दिव्याचें
गरगरतें थरथरतें चंचल
त्या सोन्याच्या मंडलांतुनी
हळूच उठती
गोरे गोरे दोन हात मग
गोरीं बोटीं
लांबसडक निमुळतीं हालतीं
"लैला की उंगलियां
मजनूं की हड्डियां"
लाल नखें चमकती क्षणभरी
इवला इवला अधर हासतो
व्याकुळ दुसऱ्याच्या तृष्णेने
आणिक फुलती
कमानींत भिवईच्या सुंदर
टपोर काळीं मीनलोचनें
लांवुन बघती
घेउनि पदरीं अथांग करुणा
धावत येती गूढ नयन ते
जवळी-जवळी
भालावरती
स्पर्श रेशमी मोरपिसांचा
झुळझुळत्या पापणिचा होई
तृप्तीने मग क्षणभर माझे
नेत्र झाकती
आणि उघडती

सोनेरी धगधगतें वर्तुळ
फिरत राहतें
जळत नि जाळित

नागपूर, १४-९-५७

# माझ्या मनांत उभी तूं

माझ्या मनांत उभी तूं
माझें मनचि होऊन
निःश्वासशी कवनांत
माझी वेदना बनून

नामरूप तुझें घेती
अर्थ माझिया शब्दांचे
दग्ध पानांस दिलें तूं
स्वप्न फुलत्या फुलाचें

ऊब तुझ्या श्वासांतील
शिवे मला एकांतांत
गंध दर्वळे तयाचा
निळ्या रात्रीच्या कोषांत

तुझ्या व्याकुळ लोचनीं
साकळलें दहिवर
दूर क्षितिजीं थरारे
खिन्न सागफुलांवर

मिटे उषेच्या ओठांत
रात-तारांची कहाणी
तुटे आनंदाचा क्षण
गुंफिलेल्या आलिंगनीं

बाहु अतृप्त, आतुर
सारिलेले एकांतांत
बिलगती, बिलगती
सखे अरध्या ओळींत

हाशंगाबाद, २-१०-५५

# जन्मायचें नव्हतें मला

जन्मायचें नव्हतें मला
डाळिंबी केशरी अपरेच्या रंगाचें
प्रतिबिंब उमटे
पूर्वेच्या वदनीं
धावत्या मांसल क्षणांच्या क्षितिजीं
उमटलों तसाच मी
उगीच — उगीच
नसतां मनांत

दोन भावनांच्या जळत्या उन्हांत
दोन वासनांच्या घोर वादळांत
रुजलों, भिजलों
अकल्पिताच्या रसार्द्र भूमींत
अनिच्छेच्या काळ्या-हिरव्या देठावर
थरथरत्या इच्छेच्या दळांनी
फुललों !—अपघाताचें बावरें फूल !
हसतों आहें, डसतों आहें
माझ्या अनिच्छेला
जन्मायचें नव्हतें मला.

नागपूर, जुलै १९५५

# कवच

सांगाया मग जीभ कशाला
रहस्य उघडें सर्व तुजपुढे
शब्द मोडुं दे, ओठ मुडपुं दे
खुलें असे ना दार हृदयिंचें

पुसट अक्षरें जरि भाळींची
वाच सखे, तूं माझ्या नयनीं
लिही बाहुली जें रामायण
मृत क्रौंचाच्या आर्त रवांनी

उघडें माझें सारें जीवन
पिचलें फुटलें आघातांनी
जखमच आता कवच जाहली
रक्षायाला सत्य जीवनीं

मुंबई, ९-८-६०

# छाया चाफ्याची

छाया चाफ्याची अंगणीं
झोपेपरी चाळवते
देठांपाशीं क्षणोक्षणीं
स्वप्न फुलांचें तुटतें

खिन्न निःशब्द चांदणें
दिसे केळीच्या पानांत
साद त्याची अवघडे
दूर धूसर नभांत

रंग पानांचा हिरवा
वाऱ्यांतुनी उसासतो
उगी चांदण्यांत अशा
डोळा पाण्याने भरतो

मुंबई, १४-३-६१

# धानराजा आला दारीं

सुगी येतांच यायाचा
राया, तुझा वायदा·ना ?
चाल घेत बांधावरी
उभी तुझी 'राजी' ये ना ?

दीस सुगीचे चंदेरी
उगवती मावळती
सांजसकाळीं आभाळीं
चूर सोन्याचे सांडती

शेत आलें हुरड्यास
भात पिवळा सोनेरी
मुठी भरून धान्याच्या
रोपें नाचती शिवारीं

दीस बुडे, ये तिरपें
सांजऊन शेतावर
दृष्ट लागेल, ये झाक
तुझें कुबेरा, भांडार

याच सुगीच्या दिसांत
याच पाऊलवाटेनं
निळ्या डोंगरीं गेलास
'मल्लेचेरू' ओलांडून

दीस सुगीचेच, परी
पीक घरा नाही आलें
सोनियाचें साळवन
उभें शेतांत जळालें

बैल उपाशी दारांत
मुलें भुकेलीं घरांत
दीन घरधनी पाही
धूळ उडे वावरांत

रितें पोट आवळून
ओठीं हुंदका धरुन
शेजी हिंडती घरांत
राख झोपे चुलींतून

वारा फिरे घोंघावत
झोपडयांत झाडांतून
दूर दुष्काळहडळ
किंकाळते रानांतून

तोंच 'लेव्ही'-वसूलीला
आलें सर्कार पुकार
गांव दचकलें सारें
—आणि कापलें शिवार

गडी नेले चावडीला
दैत्य शिरले घरांत
बंड दिसलें तयांना
भुक्या गांवाच्या डोळ्यांत

मोती पिकवी जो रानीं
राजा माझ्या धरित्रीचा
पाठीवरती उघड्या
खाई मार आसुडाचा

जिच्या पदर-वाऱ्यानं
जख्ख भूमी ही तरणी
तिच्या नवतीची लाज
रडे लोळे त्रिदींतुनी

दगडाचा जीव तापे
फुटे अन्याय पाहून
लाल ठिणग्या उडाल्या
काजव्याच्या अंगांतून

त्यांत अग्निबाण राजा
उठशी तूं खवळून
क्षण चमकलें पातें
पडे कुणी उलथून

तोंच पेटली चावडी
पाठीमागे उठे जाळ
खचे भिंत एक स्फोट
एक हाक—गदारोळ

सुटे गोफण भरारा
मारुतीच्या लिंबाहून
गोळ्या झाडीत हवेंत
पळे पोलीस भीतीनं

उजाडतां झुंजुर्कांच
वेढा पडला गावास
जाळं संगीनींचं लागे
राजा तुला धरायास

कोट फोडून परी तूं
गोळ्यांपुढून गेलास
'सुगी येतां धानासंगें
येईन'—तूं म्हणालास

लाल मातींत उठल्या
लाल तुझ्या पायखुणा
पुशिल्या मीं पदरानं
माग लागो नच कोणा

कुणी म्हणे कायसें तें
भूमीगत तूं झालास
मग बळीराजापरी
ये ना आता दिवाळीस

पाणथळींत भाताच्या
पहा फूल-ऊन नाचे
ऐक चांदीची चाहूल
चाळ वाजती सुगीचे

दीस सुगीचे, करावं
कसं काय एकटीनं
पुसूं कुणा ? मुका चाफा
पाहे नुसता हासून

उभा ताड सोबतीस
धीर यानं किती दिला
याच्या झापाची साऊली
माझ्या आसवाला शेला

तुझें हदग्याचें झाड
पाहे वाट मोटेखालें
शुभ्र वाकड्या चिमण्या
चंद्रकोरींनी फुललें

दीप कापत विचारी
केव्हा येशील तूं घरीं
तुरे सोन्याचे लेवून
धानराजा आला दारीं

पायवाट ही तांबडी
येई वळणें घेऊन
कुजबुजे पावलांशीं
'कधी येतो ग राजन ?'

औरंगाबाद, ६-११-४७

# विझव दीप साजणी

विझव दीप साजणी
मम सदनांतिल तव नयनांतिल ज्योति टाक फुंकुनी

तुझ्या उरींची चंदनलतिका झुरते मम अंतरीं
स्पर्शांचा मम मोहर फुलतो तुझिया अंगावरी
या स्पर्शांचे, या लतिकेचे बहर टाक जाळुनी
विझव दीप साजणी

माझ्या मनिंचें निळें कबूतर घुमतें तुझिया घरीं
घरटें बांधी माझ्या नयनीं तव चिमणी लाजरी
या चिमणीचे, या घरट्याचे पंख टाक उपटुनी
विझव दीप साजणी

माझ्या घरची वाट रेशमी तुझ्या घरा जोडिते
तुझ्या घराची खिडकी माझ्या दाराशीं बोलते
या वाटेचे, या खिडकीचे पाश टाक कापुनी
विझव दीप साजणी

मम दुःखाची श्रावणसर तव अंगणांत वरसते
उंबऱ्यांत मम ऊन बसंती प्रिये, तुझें हासतें
या दिवसाची, ऋतुचक्राची गति टाकीं मोडुनी
विझव दीप साजणी

श्वासांचा मम अर्थ अधरिं तव शब्दांतुनि जागतो
शब्द तुझा या मनीं अरूपा प्राणरूप अर्पितो
या प्राणाचे, या रूपाचे कणकण दे उधळुनी
विझव दीप साजणी

नागपूर, १९५४

# उभी मी सदनिं दीप लावुनी

उभी मी सदनिं दीप लावुनी
सख्या रे, सदनिं दीप लावुनी
उठुनि फुलांतुनि ये जवसाच्या रात निळी रंगुनी

प्रभा नितळ सदनांत पसरतां
आंगणांत, तिमिरांत सांडतां
ये मुसमुसुनी जीर्ण रात्रिच्या यौवन गात्रांतुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

निंब बहरला मोहर गळतो
सुवासांत आपुल्या झुरे तो
बनुनि सुगंधित श्यामल क्षण हे भ्रमती शून्यांतुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

दूर दूर या समयिं कुठे तरि
आठवीत असशील तूं घरीं
जवसांच्या पुष्पांत राहिलें निशागीत विसरुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

कातरवेळीं रोज या क्षणीं
दीप लावितां अपुल्या सदनीं
उजळायाचा दीप तुझ्या घरिं आठवतें मी मनीं
उभी मी सदनिं दीप लावुनी

तिथे बसशि तूं लिहीत गीतें
राञ्र जाहली नकळे तूंतें
तव मेजावर जातें नकळत दीप सख्या, उजळुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

औरंगाबाद, १९५१

## जोगी

यांतील तुझें घर वद कुठलें ?
वुडतां दिन हें नगर गवसलें

फिरलों भ्रमलों विदींविदींतुनी
साद घातली सदनीं सदनीं
पडसादहि नच उठले फिरुनी
सुने सुने पथ नेत्रचि थिजले
यांतील तुझें घर वद कुठलें ?

धूसर काळी भयाण वसती
मुके गवाक्षीं दीप उजळती
प्रतीक्षेंत जणु ह्रदयें जळती
बघ, पश्चिमेंतुनी घन उठले
यांतील तुझें घर वद कुठलें ?

दिशा ढगें भारावुन गेल्या
गांव वादळीं हलला फुटला
धरिला तरुही पथिं उन्मळला
वीजपदर चाटून चालले
यांतील तुझें घर वद कुठलें ?

दिवा ही न घरिं तुवां लाविला
खूण ठेविला नच फुलझेला
कां शून्यीं बोलविलें मजला ?
परततां नगरदारही मिटलें
यांतील तुझें घर वद कुठलें ?

औरंगाबाद, १९५३

# आर्त डोळे शर्मिष्ठेचे

दूर आरवे कोंबडा
बांग तुरेदार त्याची
हिर्व्या पांडुर धुक्यांत
धार लवते पट्ट्याची

घंटारव आरतीचा
मंद मंद ये वाहत
घुमे नादाचा भोवरा
संथ निळ्या स्तब्धतेंत

ज्योत उषेची केशरी
जागे अंधारवडांत
स्वप्न तारकांचें बिंबे
शुभ्र बिलोरी दवांत

देठीं रुसे, दळीं हासे
प्राजक्ताची न्यारी रीत
हास्य रुक्मिणीचें फुले
सत्यभामेच्या रोषांत

देवयानीच्या दुःखाने
खिन्न शुक्र नभीं आला
क्रोधें शापुनिया जाई
ययातीच्या तारुण्याला

दग्ध जरेच्या छायांनी
जळे क्षितिजीं ययाति
आर्त डोळे शर्मिष्ठेचे
फुलाफुलांत लपती

गळे उन्हाचा धुळींत
साज पारिजातकांचा
भग्न मीलनरातीच्या
सडा माणिक-क्षणांचा

नागपूर, २९-८-५७

# श्वास चांदण्याचे दोन

कळे निशिगंधाचे तूं
माझ्या हातांत ठेविले
श्वास चांदण्याचे धुंद
दोन साकार जाहले

अंध गंधर्व शापित
फिरे एक मी जगांत
भूत-भविष्य दिसेना
सूर दावितात वाट

वायूसंगें जीवनाचा
सारा मोहर गळला
पायीं वाजे सळसळा
जीर्ण पळांचा पाचोळा

मज मोहवाया मार्गीं
थाट रूपसी, कशाला
कां ग स्मितें आंथरिशी
आणितेस अश्रु डोळां

माझ्या स्वरांचा आधार
नको घेऊं हिरावून
मिटलेल्या कमळांत
नको कोंडूं हें गुंजन

केवड्याच्या पानांतून
चंद्रकिरण झरती
स्पर्शमात्रें तशी भासे
गौर तुझी अंगकांति

तुझीं कातर कापरीं
बोटें आतुर स्फुरती
मला हळूच शिवती
लाख जिभांनी बोलती

तुझ्या कंपितांगुलींचा
होतां स्पर्श या हातास
वीज धावे तनूंतून
जाग येई ग मौनास

उन्मादक बसंताची
पिऊनिया स्वरधारा
तुझ्या अरध्या बोलांत
मारी चांदणें लहरा

रंगे 'फगवा' व्रजांत
गोफ सुटती विणती
मला जावयाचें दूर
हाक आवर बसंती

होती कुसुमें क्षणांचीं
गंध येई मातींतून
तुझ्या निशिगंधाची ही
सोबतीला आठवण

कळे निशिगंधाचे तूं
माझ्या हातांत ठेविले
श्वास चांदण्याचे खिन्न
दोन आर्द्र भारावले

औरंगाबाद, १५-१-४९

## कातरवळेला

सांजतांना तूं आलीस
किती धपापतो ऊर
जीवनाच्या आरतीचा
जळे निःश्वासीं कापूर

फुलतात गोकर्णीच्या
फुलीं सोनियाच्या ज्योती
कां ग लपविशी त्यांना
मिटोनिया नेत्रपातीं ?

पुसोनिया नेत्रदळें
लाल श्रांत सखे, झालीं
धुंद धुकाळ कां त्यांत
सांज व्याकुळ दाटली ?

ओलीं हासरीं नयनें
खिन्न वाकलेली मान
आसवांनी भिजलेली
तूं ग जोगियाची तान

भावगद्गद लाटांनी
तनु कापते मोडते
कोंडलेल्या हुंदक्यांनी
हिंदकळे, हादरते

कांही उफाळे अंतरीं
दिव्य मुक्त अनिर्बंध
तुझ्या उरींचें वादळ
तोडूं बघे देहबंध

माझ्या भाळीं आज एक
अश्रु तुझा ग सांडला
यमुनेच्या जळामाजी
ताजमहाल कापला

ताज शिळांचे शब्दांचे
आरस्पानी हे कशाला ?
कुणी जाउनिया सांगा
खुळ्या शहाजहानाला

जन्मोजन्मींच्या प्रीतीच्या
स्मृति अनंत अज्ञात
दवकणीं नभापरी
उभ्या तुझ्या आसवांत

तुझ्या माझ्या डोळ्यांतलें
पाणी पिऊनि फुलेल
तुझ्या माझ्या अंतरींची
प्रीतीची पवनवेल

अंधारांत तारकांचा
वेल मांडवाला गेला
तुझ्या माझ्या निःश्वासांच्या
त्यांत मंजिऱ्या फुलल्या

तुझ्या माझ्या भावनांचे
घोस लागले नभाला
दूर—ओल्या नेत्रीं पाहूं
रोज कातरवेळेला

औरंगाबाद, २२-१२-४८

# चंदेरी रात्रीच्या निढळीं

मध्यरात्रिचें
अवचित पडलें आज उशीवर
खिन्न मुकें अरुवार चांदणें
श्वेत पद्मपाकळी कोवळी
आठवणीचें पान रुपेरी
वाहत आलें
हारवलेल्या जीवनांतलें
चांदण्यांतल्या लहरबहरिवर...

होतें तेव्हा
असेंच पडलें
टिपुर चांदणें उशिवर अपुल्या;
हासलीस अन् धुंदपणें तूं
चंद्रबिंब भेदून पाहते
तुझी दृष्टि पलिकडे कुठे तरि;
विरतांना कापूर रात्रिचा
थरथरला रोमांच क्षणांवर
अन् हारवलें तुझ्या स्मितामधि
उशीवरिल तें टिपुर चांदणें
उरला केवळ
आनंद मग
चंदेरी रात्रीच्या निढळीं

नागपूर, १३-९-५७

## तूं प्रलयाचा यात्रिक

वीरा, तूं प्रलयाचा यात्रिक
तिमिरांतुन आलास अचानक
विद्युन्मय तव पद्चिन्हांनी
रात्र जळत उजळते भयानक

वेदकाळच्या रम्य उषेची
प्रभा तुझ्या डोळ्यांत निथळते
व्यासाच्या नयनांतिल ज्योती
पुन्हा तुझ्या मानसीं जागते

भार्गवरामाच्या परशूची
धार तुझ्या शब्दांत तळपते
युद्ध तुझें निर्वैर परंतु
जुलुमाच्या प्रतिकारापुरतें

भृगुऋषिने जी लाथ मारिली
कौस्तुभमंडित प्रभुच्या वक्षीं
ती क्रांती, तो प्रक्षोभच तूं
प्रकटलास पृथ्वीच्या कुक्षीं

बहादुरशाच्या थडग्यावरली
निराश पणती मिणमिणणारी
झांशीच्या स्वातंत्र्यलक्ष्मिच्या
आग चितेंतिल निःश्वसणारी

'तात्यां'च्या डोळ्यांतिल आशा
झुंजुनि फासावर थिजलेली
तव लेखणीच्या ओल्या शाइंत
ज्वालांचें घनवादळ बनली

घरांघरांतुन मनें पेटवित
जाशी पेटत चकमकीपरी
तप्त मनें अन् निववित येशी
वत्सल नयनांतील अश्रुपरी

लक्ष लक्ष जागले दिनमणी
शब्दांशब्दांतुनि तव तिलका,
मानवतेच्या दास्यमोचना
अखंड चालशि प्रलययात्रिका

पुणें, २१-७-५६

# तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें
जाहलीं जगाचीं सलें क्षणांमधि फुलें

प्रगटते उषा जशि अंध तमिस्रेंतुनी
मुक्तात्मा स्फुरला दास्याच्या बंधनीं
जागलें बंड जें व्यथित जगाच्या मनीं
तें रूप चिरंतन बापूचें आगळें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

वज्राची दिधली धार तृणाला कुणीं
वाकला काळही कुठे शस्त्र टाकुनी
प्राशिलें विष कुणीं जनमनिंचें हासुनी
कारुण्य चिरंतन बापूचें आगळें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

करि गुलामांस जो मानव या भारतीं
प्रीतीस देइ बळ क्रांतीचें भारतीं
करुणेंत उद्यांची करी भव्य निर्मिती
या महामानवाचरणीं उधळा फुलें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

भेदोनि नभाला विश्वें शोधी पुढे
छेदोनि तुफाना स्वर हा मंजुळ चढे
भरि संजीवनिचे दग्ध जीवनीं घडे
रविमुखिंचें थाने कनकपात्र सारिलें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

औरंगाबाद, १९५३

## दीपकळिंत या

हास्य लाजरें तेव्हा फुललें
दीपकळिंत या फूल होउनी
ती मालवतां चंद्र उगवले
स्पर्शकापऱ्या निळया क्षणांतुनि

परी बाहुवरि आज दिव्याच्या
ज्योत मनाची जळत झोपते
अन् दीपाच्या पदीं सावलिंत
चंद्रासह ती रात हरपते

नागपूर, १९५८

# माती

निद्रेच्या काठावरुनी
खुणवितें स्वप्न मज एक
अन् दूर—पैल शब्दांच्या
मज गीत बाहतें एक

परि रितें जागरण मनिंचें
जाळितें स्वप्न डोळ्यांत
कोसळे गीतयात्री हा
जड शब्दांच्या वाटेंत

टाकून फुलांचें हास्य
मग भवती नाचे माती
चमकतें उन्हाचें सोनें
काळाच्या दातावरती

नागपूर, १८-१०-५८

## टिचकी

वाजे हलु खिडकीवर वारा
पानांवर थेंबांचें पाउल
उतरे पाउस अंधारांतून
मातीच्या मनिं ओली चाहुल

काळ्या एकांतांत रात्रिच्या
घड्याळ घुमतें दूर कुठे तरी
नभा लपेटी मंद्र ध्वनि तो
चिंब रेशमी मउ वसनापरि

जडावल्या पापण्यांत माझ्या
नीज नसे अन् जागहि नाही
सजल लोचनीं फूल सुखाचें
फुलतहि नाही, मिटतहि नाही

बंदिवान मी अशा क्षणाचा
बंद कवाडें अंध तमाचीं
कोण निशेच्या या दारीं पण
वाजवि टिचकी नक्षत्रांची ?

नागपूर, १६-९-५८

## मी आलें

तुज कळलें का रे मी आल्यें
प्राजक्तापरि भाव लाजरे तुझ्या पथांत गळाले

घरास येतां गमलें तुझिया
फुलें अश्रुंचीं होतिल राया,
कोप शाप अपमान बांधुनी पदरीं इथवर आल्यें
तुज कळलें का रे मी आल्यें

झुरत्या श्यामल श्रावणसरिपरि
क्षितिजि फुंदत्या फूलउन्हापरि
आलें, गेलें, परि तव चाफा ना बोले, ना हाले
तुज कळलें का रे मी आल्यें

मृगनाभींचें सगंध स्पंदन
तारांचें घेऊनि जागरण
दारिं ठाकलें उषा बनोनी, निशा करपुनी झाल्यें
तुज कळलें का रे मी आल्यें

विस्मृत वचनें अधरिं कापती
धडधडत्या उरिं गाणीं पिचती
फुलांत सौरभ धूप होउनी पवनीं जळत उफाळ
तुज कळलें का रे मी आल्यें

फिरतां पुलिनीं उन्हांत कवळ्या
मिळल्या अपुल्या क्षणिक सावल्या
मीलनस्मृति ती मनिं साठवुनी तुडवित जन्म निघाल्यें
तुज कळलें का रे मी आल्यें

औरंगाबाद, ५-१२-४८

# मेंदीच्या ताटव्याशीं

मेंदीच्या त्या ताटव्याशीं
क्षण थांबलों आपण
दरवळला अंधार
कस्तुरीच्या सुगंधानं

क्षणीं एका त्या हीं मनें
भूत-भविष्यीं धावलीं
जशीं कस्तुरीहरिणें
आत्मगंधें झळंबलीं

निळ्या सजल ढगांची
मध्यरात्र ही मखमली
काय जपून ठेवील
गूज आपुलें सकाळीं

दोन उरांचें स्पंदन
दहा बोटांचें कंपन
ज्यांत गुंफिलें आपण
तुटणार तोही क्षण

परी पुन्हा कधीं येतां
मेंदीपाशी क्षणभर
कस्तुरीच्या सुवासानं
दरवळेल अंधार

नागपूर, २९-७-५४

# पुष्कराजस्मितें

फूल मेंदीनं धरिलं
सखे, फिरुनी अंगणीं
तम मोहरे सगंध
गूढ हास्याच्या तुऱ्यांनी

वाके दिशा घनभारें
भेटे धरा आकाशाला
उघडिला मृत्तिकेंत
लाख नक्षत्रांनी डोळा

गंध मातीचा मादक
येई निर्लेप गगना
स्मरे तुज पाहिलेलें
खिडकींत हासतांना

—आणि आज शोधितों मी
इथें खिन्न अंधारांत
तुझीं पुष्कराजस्मितें
मुद्रिकेंतल्या खड्यांत.

नवी दिल्ली, १९५५

# उघड ऊर्मिळे कवाड

उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची
सोनपाउलें क्षितिजीं उमटती दिनाचीं

गंधवाह मंद मंद
शांतीचा जणु मरंद
गारवा पिऊनि येई धार अमृताची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

फुलती फुलें तरुलतांत
रांगोळ्या अंगणांत
किणकिणते प्रेमळता त्यांत कंकणांची
उघड ऊर्मिळे कवाड उजळतसे प्राची

गवत डुले केवि अता
प्राणमया जणु कविता
हिरवळते लसलसते तरुण जीवनाची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

लखलखतें धगधगतें
कनकचक्र नभिं फिरतें
रविबिंब न अनिरुद्धा गतिच युगयुगाची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

रात्रींचें तम पिऊन
ये पहाट ही हरिखुन
विष पचवुनि जयहसितें फुलति शंकराचीं
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

१५-९-४८

# धुक्यांत रस्त्यावर

धुक्यांत रस्त्यावर थकलेले
दिवे जांभई देती पिवळी
आळसावुनी अंग मोडिती
निळ्या डोंगरीं उंच नारळी

पहाट अजुनी फुटली नाही
आतुर आरुण गगनकिनारा
अपुऱ्या चुंबनिं विकल स्फुरतो
अधर तुझा जणु सखे, लाजरा

मधुगंधाचें पाउल वाजे
वाऱ्याच्या मनिं कळी हासतां
तळयांत दचके संथ निळें जळ
चंदेरी मासळी उसळतां

अर्धोन्मीलित गुलाब पिवळा
एकाकी घाबरा निज दळीं
त्यांत हसे सखि, गगनबावरी
तव मनिंची पिवळी पाकोळी

शुक्राच्या चांदण्यांत नाहुन
येशिल सखये, मला वाटलें
माझ्या डोळ्यांतील जागरण
नक्षत्रांपरी जळत राहिलें.

नागपूर, १६-८-५४

# प्रभातरल गुदगुल्या

प्रभातरल गुदगुल्या मुलायम
हळुच नभाला केल्या कोणीं
रात्र कुशीवर वळली हासुन
स्मित फुटलें क्षितिजाच्या कोनीं

नक्षत्रांच्या अबोल वेली
पूर्वेच्या दारावर सुकल्या
बोगनवेली धुंद शराबी
परंतु माझ्या दारीं लवल्या

आग शोषुनी ज्वालांचीं हीं
शीतल पानें कशीं उमललीं
रतिच्या अश्रुजलांनी भिजुनी
चितेंतुनी मदनाच्या फुललीं

कुण्या जन्मिची कुणास ठावें
एक वेदना अशीच सुंदर
माणिकपानांमधुनि सखे, या
स्पर्शुनि करिते मजला कातर

नागपूर, १६-८-५४

# अशा वेळीं जागे कोण?

रात विरळ वस्त्राची
पीत पानकेवड्याची
शरदाच्या चांदण्याची
शहारते पानोपान
अशा वेळीं जागे कोण ?

डोंगराच्या खांद्यावर
निळें तापलें गगन
मान टेकितें श्रमून
उरे तारांचें स्पंदन
अशा वेळीं जागे कोण ?

गिरी निळे स्तनाकार
उमे धुंद दिशांतून
तटतटतें यौवन
कळ निघे वाऱ्यांतून
अशा वेळीं जागे कोण ?

पाडा आलेल्या फळाची
निळी-गाभुळी ही रात
गाई आंब्याच्या कानांत
साद जाईच्या रानानं
अशा वेळीं जागे कोण ?

क्षितिजाशीं चांदण्यांत
शब्द विरे, हाले ओठ
पुरूरवा मध्यरात्रीं
        बाही ऊर्वशीलागून
        अशा वेळीं जागे कोण ?

औरंगाबाद, १९-१०-५३

## कोजागरी

कोवळ्या चांदण्याची
दूधभरल्या धुक्याची
धुंद रात शरदाची

जोंधळ्याच्या शिवारांत
घोट चांदण्याचे पीत
दाणा भरे कणसांत

कापसाचीं सोनफुलें
डोळा जांभळा मोडून
हासतात खुणावून

स्वप्न अधरगोडीचें
हासे उसाच्या तुऱ्यांत
त्याच्या आंधळ्या डोळ्यांत

मधुकलश घेऊन
येई रात कोजागरी
'कोण जागतें ?' विचारी

जागे बीज कणसांत
जागे भरारी पंखांत
आणि कांही तारकांत

जळगांव-मनमाड, १६-१०-५३

# —आणि वाहतें शतद्रुती मी

(वेदकालीन शतद्रुती म्हणजेच आजची सतलज नदी. हीं तिचीं कांही स्मृतिचित्रें. दुसऱ्या स्तवकांतील आठवणीला ऋग्वेदांतील विश्वामित्र-नदी संवादाचा आधार आहे.)

। १ ।

शतद्रुती मी सलीलचरणा
फेनिल लहरी विधुकांतीची
सलज्ज कंपित मी स्मितधारा
मृडानिच्या चुंबिताधरींची !

आर्यांच्या भाग्याची सुंदर
रेखा विजयी मी जरतारी
प्रणयनर्तनीं प्रमद्वरांची
नूपुर-झंकृति मी चंदेरी

इंद्राच्या वज्राचें पाणी
मी धरणीवर लहरत आलें
मैनाकाचे पंख कापुनी
धुळींत पुष्पें फुलवित चालें

गोमाता जर धरा तिचा मग
वत्सल आंचल मी अमृताचा
खिणखिणती उच्छृंखल हयिनी
स्फुरतो जेव्हा शंख रणाचा

शतद्रुती मी अशी वाहतें
मंथर केव्हा, कधि वेगांत
तटीं थांबुनी काळ पुरातन
बिंब बघे निज, विमल जळांत.

। २ ।

शतद्रुती मी अशी निघालें
एका रात्रीं वर्षाकालीं
भिजल्या पिवळ्या कमलदळांपरि
चांदरातिचीं क्षितिजें फुललीं !

तोंच धडधडत रथ भरतांचे
माझ्या तटिं येऊन थांबले
विश्वामित्र मुनी भरतर्षभ
रथांतुनी पुलिनांत उतरले

हिमवंताचा पुराण अनुभव
हासे त्यांच्या शुभ्र जटांतुनि
नयनीं त्यांच्या ज्योत तपाची
स्रवे सोमरस वाणीमधुनी :

“ तुम्हि इंद्राच्या परमेच्छेच्या
अखंड गतिमय जीवनधारा
स्नेहल वत्सल जलवंतींनो
हाक आमुची ही अवधारा

क्षणैक तुमचा वेग थांबवा
माउलिच्या ममतेने बाई
तरुनि जाउं द्या भरत-संघ हा
इंद्र-कार्य संपादो विजयी. ”

"लवे पितृपदिं कन्या प्रेमळ
माता वाके शिशु पाजाया
नमतें तैशी मी नावेक
मुने, तुम्हांला वाट द्यावया." [१]

भरत पोचले पैलपार अन्
विशाल भारत तयें निर्मिला
दक्षिण सिंधूच्या मोत्यांतुनि
काश्मीरांतिल गुलाब हसला!

। ३ ।

शतद्रुती मी गात चाललें
अखंड गाणीं जीवनगतिचीं
तरारती लहरींच्या नयनीं
हिरवीं स्वप्नें समृद्धीचीं

सम्राटांचें अभिषिंचनजल
पाणी मंगल संकल्पांचें
संध्यारंजित अर्घ्य अनर्पित
मनीं उसळती आज-उद्याचे

उसळत फेसाळत किति शतकें
माझ्या लाटांसंगें सरलीं
दास्याच्या शृंखला तोडितां
दुभंग भारतभूमी झाली!

१. "नि ते नसै पीप्यानेव योषा । मर्यायेव कन्या शश्वचै ते"—विश्वामित्रनदी-संवाद, ऋग्वेद, मंडल ३-३३

मुक्तिदिनाची प्रथम उषा ती
क्षितिजीं निःश्वासें आहळली
प्रचंड द्वेषाच्या आघातें
हिमालयाची मान मोडली

गुढ्यातोरणें नभिं धुरकटलीं
घरें नि नगरें जळती खाली
उभारितां ध्वज स्वातंत्र्याचा
मानवता उन्मळून पडली !

। ४ ।

'सतलज' मी आजची अभागिनि
निराधार नयनींचें पाणी
दुभंगल्या देशाचें अंतर
रडतें दोन्ही काठांवरुनी

शतद्रुती मी सीमेवरती
जखम वाहती उरिंची झालें
एका रात्रिंत स्मितधारेची
एक करुण किंकाळी बनलें !

दिवसा तापे पुलिनीं वाळू
जळती छाती ती पुरुषांची
काळोखांतिल जल कलकलतें
दग्ध आसवें अभागिनींचीं

विश्वामित्रा वाट द्यावया
सहज वाकलें मी त्या रात्रीं
आज परंतु माझीं बाळें
तडफडती या तीरीं, पात्रीं

जखमी पीडित मम संतानें
त्या दिनिं धावत आलीं तीरीं
पैलतटीं त्यां नेउं न शकलें
आग जाळिते हीच अंतरीं

। ५ ।

उन्हांत पिवळ्या खिन्न रंगले
लोट धुळीचे उठती भवती
विश्वाचीं काचेचीं क्षितिजें
फुटुनी खळखळ जणु कोसळती

धुळींत थकले पाय वाजती
फुटति हुंदके, शरिरें कण्हती
डोळे—कवड्या रडती निर्जल
शब्द तृषित ओठींच करपती

'सुलेमानकी' पुलावरी मम
अजून रांगा दिसति चालती
मानवयात्रा करुण भयानक
पोखरलेल्या आत्म्यांची ती

दूर लांब ती रांग चालते
जणू मानवी वारुळ फुटलें
की धूळीच्या प्रलयपुरांतुनि
प्रेतांचे खच वाहत आले

असे चालले दिवसमास हे
घाशित ढकलित एकांमेकां
तुटलीं पानें उडती शोधित
अपुलीं देठें, अपुल्या शाखा!

माझीं बाळें न हीं माणसें
मनावीण सापळे पिढ्यांचे
स्मृतीवीण की मनें तमोमय
पत्थरलेले नेत्र युगाचे

घरदारें, धन, भूमि सोडुनी
नात्याचे मृदु वंध तोडुनी
नीति रीति अभिमान तुडवुनी
कंदे जीवन रांगांमधुनी

प्राणासाठी भिउनि पळाले
पुत्रपत्निमातांस सांडुनी
रांगा त्यांच्या इथे सरकती
कुलें कुटुंबें पडलीं मोडुनि

उघडी पडली लाज सावडुनि
पतिव्रता रांगेंत चालती
दगडादगडांमधुनि अहिल्या
लक्ष लक्ष उःशाप मागती

दूध कुठे छातींतुनि फुटतां
कुशींत मूल न पाजायाला
बाळा पाजूं बघे आइ जों
स्तनचि कापिले कळे तियेला

जवान कुणि 'रांगे'च्या काठीं
व्यथित पडे तडफडे भुकेनी
धावत ये कुणि करुणा वेडी
जगवूं त्या निज स्तन्य देउनी

वाकुनि शुष्क स्तन तन्मुखिं दे
लाज व्यथा हुंदके गिळोनी
उभें गगन तडकलें सांधलें
दिसे क्षण तिच्या गढुळ लोचनीं

परंपरा, संस्कृती, नवयुगें
सर्वच भूकंपें कोसळलीं
निर्वासित हे त्यांचीं शकलें
दिक्कालांतुनि पहा पसरलीं

दिवसाच्या डोळ्यांत हाललें
स्वप्न अमानुष संहाराचें
हाहाःकारचि हे घोंघावति
ढासळलेल्या विश्वात्म्याचे

अशी अभागी यात्रा चाले
'सुलेमानकी' पुलावरुनी
दो तीरांवर दो राष्ट्रांचें
सैन्य उभें संगिनी घेउनी

—आणि वाहतें शतद्रुती मी
सीमेवरती पुलाखालुनी
परकीं झालीं एकामेकां
दोन्ही तीरें माझीं असुनी !

औरंगाबाद, १९५१

# केव्हा ?

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ८५९९८ दि: ८।१०।९
१९६२ नों दि ९।८।३।८७

ही किमया केव्हा घडली ?

नभीं घनावळ खिन्न सावली
ग्रीष्मामधुनी झुरली जळली
तिच्या व्यथांना परि अमृताची धार केधवा फुटली
ही किमया केव्हा घडली ?

शाखांमधुनी पानांमधुनी
देठादेठांतुनि पिळवटुनी
नवकोंभाच्या कळांतुनी कधि सुमनसहस्रें हसलीं
ही किमया केव्हा घडली ?

अथांग मौनांतून रात्रिच्या
अलोम उरिं निष्कंप नभाच्या
सांग साजणी, नक्षत्रांची चकमक केव्हा झडली
ही किमया केव्हा घडली ?

नागपूर, ऑगस्ट १९५४

ग्रंथ संग्रहालय ठाणे
92680

# ती पवळ्याची वाट

लाल वाट रेशमी बाहुचा
कटिस गिरीच्या विळखा घालुन
वळते लाजत धुळिंत तांबड्या
अभ्रक हासे लाल खडींतुन

कर वाटेचा हळुच दाबितो
हिरव्या झाडिंत हळवा डोंगर
पुलकित होते वाट, खड्यांचीं
फूलपाखरें बनती सुंदर

पायथ्यास आकाश पिंजलें
तलाव फेनिल धुंद उसळतो
लाटेचा कोंबडा तटाला
निळसर नवखी बांग घालितो

तलम मल्मली विरल शुभ्र ढग
रविबिंबावर भुरभुर उडती
हेमंताच्या उन्हांत पिवळ्या
सोनकेवडे फुलती—खुपती !

ऊनसावलिंत अशा साजणे,
त्या एकांत प्रवाळपथावर
तें अपुलें बेहोश भटकणें
स्मरतें परतुनि घरिं आल्यावर

तुझ्या नयनिं अन् पुन्हा उमटते
ती पवळ्याची वाट शेंदरी
फूलपाखरांसवें हिंडती
मनें आपलीं झुरींबावरीं

नागपूर, १९५४

# आणखी एक पान गळलें

झुळुक आणखी एक—आणखी एक पान गळलें

पानीं फुलला सुमनिं बहरला
माझ्या अंगणिं जरि तरु वठला
शुष्क डहाळिंत अंग मोडिती कोंभ नवे इवले
—आणखी एक पान गळलें

चंद्रकोर अंगांगीं भरली
दिनदिन कणकण उजळुन खिरली
परि अवसेच्या प्रभांत-ओटिंत सूर्यबिंब भरलें
—आणखी एक पान गळलें

चरण एक गीताचे सरले
स्वर अवसानीं शांत जाहले
त्या मौनांतुनि पुढिल चरण परि झंकारा सजलें
—आणखी एक पान गळलें

खुशाल गळतां, गळा दळांनो
हसत सरा माझिया क्षणांनो
बघे क्षणांच्या पानझडिंत मी अक्षयपण उमले
—आणखी एक पान गळलें

औरंगाबाद, १३-९-५१

# कुमारी

कां अधीरता ? कां सुखांत सलतें कांही ?
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

सावळ्या सावलिंत शीतळता निजसुरी
सखि, धुंद मदालस अंग अंग हें करी
अन् उन्हांत काटा गोड उठे तनुवरी
मृदु यौवनांगिची ऊब शिवोनी जाई
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

उमलत्या फुलावर सदा कुणी हासतें
त्या दळादळावर नवें स्वप्न उमलतें
ढग-गूज मनींचें भिरभिरतें धावतें
यौवनास घाली शीळ अथांग निळाई
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

चांदण्यांत धूसर गगन धरेला मिळे
कुणि गाढालिंगन मजहि गमे दे बळें
मग चांदणेंही लज्जेंत दिसे रंगलें
कुस्करति चुंबनीं गाल; झुळूक कशी ही ?
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

शिरणापल्ली, २३-१-४८

# सख्या, कां गायिलेंस तें गान

सख्या, कां गायिलेंस तें गान ?
असह्य होतो विद्ध जिवा या तुझ्या स्वराचा ताण

सभेमधी तूं गीत गाइलें
सगळ्यांपरि तें मीं ऐकियलें
वीज शरीरीं शिरली कसली ? कां गळलें रे भान ?
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

सभा डोलली तुझ्या गायनीं
धरा उचलिशी तूं शब्दांनी
मज एकाकिनि केलें कां परि—जळिं कमळाचें पान
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

शब्द मधुर तव वातावरणीं
येती सांगत भावकहाणी
विसरें मीही तनुमन सारें, रोमांचांची आण
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

पदर गळाला कसा आठवूं
थरथरत्या उरिं कसें साठवूं !
तृषित तटां स्पर्शून सागरा, परते तुझें उधाण
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

संपवुनी तूं कविता जाशिल
कीर्तिफुलांचे गेंद झेलशिल
हेंहि सवें ने, उपसुनि देतें मम हृदयांतील बाण
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

औरंगाबाद, ८-६-४७

## मज माझाहि न अधिकार

मज माझाहि न अधिकार
असुनी मी स्वामिनी भिकेस्तव बंद तुझें मज दार

जनवनिंचे मी जाळ विझवितें
स्वयंचद्रिका अमृत वर्षतें
परि जळतें तव हृदय पाहणें शाप मला अनिवार
मज माझाहि न अधिकार

वागीश्वरि मी शब्दलाघवें
शून्यांतहि वदवीन पारवे
हाय शक्य नच मला छेडणें तुझ्या मनाची तार
मज माझाहि न अधिकार

हिरण्मयी मी प्रकाशधारा
विश्वाचा उजळीन उंबरा
सांजवात तव घरीं कराया मी दुबळी लाचार
मज माझाहि न अधिकार

वासंतिक मी झुळुक चिरंतन
जळलेलें हें फुलविन त्रिभुवन
हसवितां नये तुझ्या मनींचें फूल खिन्न सुकुमार
मज माझाहि न अधिकार

परक्याची मी झालें म्हणुनी
माझें परकें मला जीवनीं
नाकारावें सर्वस्वच मी हाच धर्म आचार
मज माझाहि न अधिकार

औरंगाबाद, १०-१२-४८

# अर्घ्य

(कै. माधवराव पटवर्धन यांच्या स्मृतीस)

लेखणिची शाई अजुनि वाळली नाही
तों सारुनि कविता उठला, केली घाई
नव स्वप्नसाउली सरलि न नयनाहूनी
कां नयन मुरडिलें तोंच जगापासूनी
नव 'छंदें' करि शारदा सुरु नटनाच
कां असा अचानक ताल सोडिला तोंच ?

यश मायबोलिचें तुवां दिगंतीं केलें
'ही धन्य मराठी माय' सह्यगिरि बोले
तूं जागविलें बळ मातेच्या दुग्धींचें
नव उषःकाल अन् सुप्त तरुण रुधिरींचें

हिम पडे जरेचें शिरीं स्मित मुखीं तरुण
तव मूर्ति उभी ती पुढे दिसतसे अजुन
तोलिलास वीरा, ध्वज रुधिरहि ओकून
रक्त तव पसरलें अरुणोदय होऊन
हा त्रुटित ताल तव आपण काळ धरील
युगगान उद्याचें शारदाच गाईल

परि आज तुझ्याविण दीन मराठी वाणी
मधुचषक भंगला, खिन्न उभी मधुराणी.

हैद्राबाद, २७-१-४०

# भिजूनीहि पावसांत

भिजूनीहि पावसांत
वीज विझे न गगनीं
पालवते अशी ज्योत
आंत आंत माझ्या मनीं

झोप मोडली तरीहि
स्वप्न माझें न मोडतें
आता माझ्या डोळ्यापाशी
शीव त्याची न संपते

वेडी जीवनाची वाट
जरी संपली पुढती
तरी नवे नवे आज
पंथ पावलां फुटती

तारापथाच्याही पुढे
वाटे चालत जाईन
डाग चंद्रबिंबावरी
माझ्या पावलांची खूण

परि आज मी एकाकी
मार्ग चालतों धुळींत
पाय थांबती थकून
वाट वळे फूत्कारत

पुढे लोंबे झाडावर
रितें मोहळ उदास
मध, मधमाशा गेल्या
हसे विषण्ण आकाश

'मधु क्षरंति सिंधवः'
कुणी दुरून बोलले
पाहिलें मीं वळोनिया
तुझे डोळे ओलावले

भिजूनीहि पावसांत
वीज विझे न गगनीं
पालविली अशी ज्योत
सांग कुणीं माझ्या मनीं

नागपूर, ५-८-६०

# भिजूनीहि पावसांत

भिजूनीहि पावसांत
वीज विझे न गगनीं
पालवते अशी ज्योत
आंत आंत माझ्या मनीं

झोप मोडली तरीहि
स्वप्न माझें न मोडतें
आता माझ्या डोळ्यापाशी
शीव त्याची न संपते

वेडी जीवनाची वाट
जरी संपली पुढती
तरी नवे नवे आज
पंथ पावलां फुटती

तारापथाच्याही पुढे
वाटे चालत जाईन
डाग चंद्रबिंबावरी
माझ्या पावलांची खूण

परि आज मी एकाकी
मार्ग चालतों धुळींत
पाय थांबती थकून
वाट वळे फूत्कारत

पुढे लोंबे झाडावर
रितें मोहळ उदास
मध, मधमाशा गेल्या
हसे विषण्ण आकाश

'मधु क्षरंति सिंधवः'
कुणी दुरून बोलले
पाहिलें मीं वळोनिया
तुझे डोळे ओलावले

भिजूनीहि पावसांत
वीज विझे न गगनीं
पालविली अशी ज्योत
सांग कुणीं माझ्या मनीं

नागपूर, ५-८-६०

# साजणी, आज गातसे रात

साजणी, आज गातसे रात

चंद्रकराने मेघ रंगले
काजळकाठीं अमृत भरलें
तव सोनेरी नजरेमधली झळक फेसळे त्यांत
साजणी, आज गातसे रात

सरल्या सरिचें साकळलें जळ
पानांतुनि टपटपतें अचपळ
उमटे स्पंदन तुझ्या उरीचें त्या अधीर सलिलांत
साजणी, आज गातसे रात

लपविलेंस जें शब्दीं हसुनी
प्रगटे तें लज्जेतुनि नयनीं
रुकार तो प्रीतिचा पसरला तृप्ति बनुनि गगनांत
साजणी, आज गातसे रात

खोल व्याधशर घेउनि अंतरिं
पुंज मृगाचा हसे अंबरीं
असेंच कांही प्रकाशतें अन् सलतें या हृदयांत
साजणी, आज गातसे रात

सौरभ सुमनांमधुनि निघाले
तंतुबंधनांतुनि स्वर सुटले
स्वप्नें अपुलीं निद्रेमधलीं विमुक्त अवकाशांत
साजणी, आज गातसे रात

औरंगाबाद, ६-१०-५०

# शिशिरगान

हलके हलके हसतें गळतें तरुचें पान न् पान
        बाई, तरुचें पान न् पान
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
        बाई, शिशिरऋतूचं गान

        हिवांत रानें पिवळीं पडलीं
        उषा धुक्यामधि ही काकडली
        ओठच उलले संध्यालाली
नक्षत्रांची रात शहारे गारव्यांत हैराण
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
        बाई, शिशिरऋतूचं गान

        पर्णहीन तरुशाखा हलती
        कृश विरही बाहूच पसरती
        आतुर आलिंगना कांपती
स्मरुनि विरहिणी महाल मिठिचा विकल पाखडी प्राण
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
        बाई, शिशिरऋतूचं गान

        थंडगार किति पवन झोंबतो
        उन्हाच्याहि उरिं काटा उठतो
        पानफुलांचा बहर झडपतो
गळेल वाटे चांदण्यांत हें निळें नभाचें पान
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
        बाई, शिशिरऋतूचं गान

फुलें जळालीं पानें गळलीं
फळांत जरि रसधार गोठली
सर्व सृष्टि जरि हिमें करपली
पिवळ्या पानांच्या मनिं फुलतें वसंतस्वप्न महान्
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई शिशिरऋतूचं गान

नागपूर, १९५४

## चांदणें इथे अश्रु ढाळितें

चांदणें इथे अश्रु ढाळितें
सावल्यांत कवडशांत कोणी व्यथित मनें हिंडतें

जें निःश्वासाने कधी न कोमेजलें
आसवीं कुणाच्या जें न कधी चिंबलें
दुःखानलें चुकुनी जें न कधी पेटलें
तेंच चांदणें सुरूतरूतुनि, गुलाबांत स्फुंदतें
चांदणें इथे अश्रु ढाळितें

जें ऊर्वशिच्या चिरतरुणस्मितिं जन्मलें
विष पिउनि मिरेच्या भजनीं जें गुंजलें
रतिनयनीं मदनासवें जळुनि प्रकटलें
तेंच चांदणें पुष्करिणीतटिं मुसमुसुनी क्रंदतें
चांदणें इथे अश्रु ढाळितें

स्मरणांत कुणाच्या कुणीं शिल्प बांधिलें
ती बेगम सुंदर, शहा न ते राहिले
सुखविलास त्यांचे फुलांपरी वाळले
शिलेंत या परि अमर भावना त्यांची निःश्वासते
चांदणें इथे अश्रु ढाळितें

पुंडरीक मिटलें मूक उभा 'मुकबिरा'
हुंदका आर्त युगविरही हृदयांतला
या आरस्पानी शिलांतुनी उमटला
अमृतें नाहुनि हृदय नभाचें गहिवरतें, दाटतें
चांदणें इथे अश्रु ढाळितें

निस्तब्ध शिल्प हें डोंगरास टेकलें
विरहाच्या अंकीं प्रेम स्थिर झोपलें
की जीवनस्वप्नचि मृत्युमनीं तरळलें
स्मृतिविस्मृतिच्या सीमेवरती कविता ही बोलते
चांदणें इथे अश्रु ढाळितें

औरंगाबाद, १७-४-४९

## गीतांच्या पैलतिरीं

निळ्या रात्रींच्या निष्पंद छायांत
काटा सलतो
तुझेंच साजणी विद्ध मनाने
मी गीत गातों

सूर गीतांचे माझ्या व्यथेंतुनी
येती फुटोनी
दूर झळके क्षणाच्या शिखरीं
सोन्याचें पाणी

पैलतिरीं सखे, माझ्या गीतांच्या
तुझी वसती
निःश्वासकोमल हे सूर तुला
शिवूं पाहती

स्पर्श तुझा परि दैवीं न माझ्या
होई काहली
उध्वस्त कुंजीं अंधाराचें पीस
फिरतें भाळीं

व्यर्थ शब्दांच्या ऐलतिरीं तुज
साद घालितों
निळ्या रात्रींच्या निष्पंद छायांत
काटा सलतो

नागपूर, ३-१०-५७

# कवींद्रा, तें गाणें दे

(एक रवींद्रस्मरण)

. १ .

तें गाणें दे
कवींद्रा, तें गाणें दे
ज्याच्या लयींत ज्याच्या गतींत
गूढ धूसर धुक्यांत फिरणाऱ्या
पृथ्वीच्या सोनेरी नारंगी कडा
असीमाला प्रदक्षिणा घालीत असतात—
तें गाणें दे
कवींद्रा, तें गाणें दे

. २ .

अजूनहि ही धरणी
त्या गाण्याची वाट पाहात आहे
वाऱ्यांतून, फुलांतून
आकाशाच्या रंगांतून, सागराच्या तरंगांतून
तें गाणें शोधीत चाललेल्यांना
आनंदाच्या मुशाफिरा,
तूं तें गाणें दिलेंस
अनुक्ताचा तो शब्द
त्यांना तुझ्या गीतांत सापडला
तुझ्या ध्रुवपदांत आढळला
शाश्वताचा तो सूर
शून्यापलीकडील निःशून्याचा अनाहत नाद
त्या अनादाला नाद दे
कवींद्रा, तें गाणें दे

. ३ .

तुझे शब्द
चिरयौवना ऊर्वशीच्या
अंगकांतींत न्हाऊन आले
उपेक्षित ऊर्मिलेच्या डोळ्यांतील
दुःखाचें काजळ लेऊन आले
वंचित व्यथित देवयानीचा शाप
तुझ्या वाणींत उःशाप झाला
संजीवनीचा मंत्र बनला
दुखऱ्या खुपऱ्या यौवनाला
विसर्जनाचें गाणें दे
वेदनेचा वेद दे
कवींद्रा तें गाणें दे

. ४ .

आजहि तेच वारे वाहात आहेत
तेच तारे जागत आहेत
तींच फुलें तींच उन्हें
हासत आहेत, मावळत आहेत
नदी पुढेच धावत आहे
पाण्यावर नाव डोलत आहे
प्रश्नाकार !
नावाडी पण कुठे आहे ?
ह्या नावेला वल्हवणं दे
नावाड्याला गीत दे
मुक्त नदीला काठ दे
काठालाहि गाणें दे
कवींद्रा, तें गाणें दे

. ५ .

मानवतेच्या सागरतीरावर
तशीच यात्रा जमली आहे
वाळूंत वेणु वाजत आहे
मरणाच्या दारीं
सोन्याचा पिंपळ डोलत आहे
परंतु—
स्वरांना बहिरे
प्रकाशाला आंधळे बनून
आम्ही भटकत आहों
अणुगोलाच्या धुराने कोंदलेल्या क्षितिजांत
अश्वत्थाम्यासारखे !
शापित चिरजीवन घेऊन
मस्तकांतील मणि हारवून
सूडाने हिंसेने कुष्ठी बनून
दिवसरात्रीच्या वाटेवर

. ६ .

संध्येच्या पलीकडे
तूं अजूनहि गात उभा आहेस
तुझ्या शब्दांत
आनंदाचीं उन्हें आहेत
फुलांचे रंग आहेत, गंध आहेत
सतेज ताजे
या शतकाच्या दवांत भिजून
अश्रु पिऊन
कोंडलेल्या या दिशांना

उषेंतल्या त्या आहाळलेल्या स्वप्नफुलांना
फिरून उन्हाचा स्पर्श दे
कवींद्रा, तें गाणें दे

## इतुक्यांत कशी झोप तुझी झाली!

शांत पाचुबंद डोंगरमाथा
रुपेरी दुपार हेमंत उन्हाची
रेशमी एकांत
सळसळणाऱ्या श्याम सावल्यांचा
बसलों आपण दोघें, तरुतळीं
भर उन्हांत अंधार पालवे पानांच्या जाळींत
रुळत हलत
एक कवडसा चंद्र होऊं पाहे तुझ्या मानेवर
कांहीसें बोलून डोळ्यांत हसून
घेशीं हातीं हात—
नभवेडी वाट भोवळली पुढे
चढतां वळतां डोंगरावरती
स्तब्ध सागराचें नीजनिळें पाणी
दूर शुभ्र शीड
स्वप्नांचा ठिपका जळाचे लोचनीं
मान लवे तुझी माझ्या खांद्यावर
निमीलित डोळे—
काय झोपलीस गुंफून हातांत ऊनसावल्यांना ?
नाही मला झोप (येतच नाही)
तहान मात्र
मिटल्या डोळ्यांत निरंजनीच्या निगूढ निजेची
आलिंगनस्पर्शें तुझ्या त्या क्षणाच्या
अर्धनारीनटेश्वर
झालों मी अनंत
क्षणाक्षणावरी नाचत चाललों
डमरू माझ्या हातीं

वाजतो, निर्मितो निःशब्दांत शब्द
तुझ्या मुखीं स्मित चकित कोवळें
चांदणें अर्थाचें सृजनाच्या
उघडिलेस तोंच हळू डोळे
दुपारचें गुंग ऊन प्यालेले
निथळत राहे
पैल उन्हावर त्र्यंबकाचें स्मित
उन्हाच्या मुशींत रसरसणारें नीजनिळें पाणी
स्तब्ध सागराचें
भर उन्हामधी वृक्षाच्या तळाशीं
गर्भरेशमी अंधाराची पात हालत राहते
इतुक्यांत कशी झोप तुझी झाली ?

मुंबई, २६-९-६१

# मी वाट आहें

मी वाट आहें
गति नाही, लय नाही मला
पण वाटसरांनो,
तुमच्या पायांच्या धावत्या ठेचळत्या चालींत
माझ्या प्रस्थानाचा
अनंताचा थाट आहे
मी वाट आहें.

. २ .

पहा, माझ्या कुशींत
हा पाटीवाला झोपला आहे
उशालगत
टोपलीच सावली झाली आहे त्याची
शेषफणासारखी
आणि हा शेषशाई भगवान झोपला आहे उताणा
निद्रेशिवाय, अंधारी येऊन
थकण्याच्या—चमकत्या काजव्यांच्या—बेभान गुंगींत
त्याच्या स्वप्नांत
झाडांतला गांव—हिरवा दूर
कुडाची झोपडी
एक मोडकी खाट आहे...
मी वाट आहें

. ३ .

उस्कटलेले चिरे माझ्या छातीचे
मध्येच जळती धगधगती शेकोटी

भोवती बसल्या आहेत
खडी फोडणाऱ्या चार काळ्या छाया,
काळ्या दगडाचीं पिकलेलीं घनभोर स्वप्नें
पण हे दगडहि शहारतात
कारण तलम अंधारांतून
दुरून येणारा
वाऱ्याच्या काळजालाही कापीत जाणारा
लवलवत्या ज्वानीचा
नखरेल घुंगरांचा
मस्त बेभान छुमछुमाट आहे
मी वाट आहें

. ४ .

पण ही कुजकी घाण कशाची ?
विसरलेंच होतें
पलीकडे कोपऱ्यांत उकिरडा आहे
(काय म्हणालांत—इथे कशाला ? वाटेवर आहे; टाळणार कसा ?)
तर काय म्हणत होतें—उकिरडा आहे
पत्राळीचा खच पडला आहे
काठाशी बसला आहे
एक वेडा—नंगा
डोक्याला गोणपाट गुंडाळून
ओढतो आहे एक उष्टी पत्रावळ
तोंच पलीकडून
कुत्रें गुरगुरतें तीच पत्राळ ओढीत
वेडा खदखदून हसतो
फुटक्या मोरींतील सांडपाण्यासारखा
गॅसबत्तीच्या त्या वखवखत्या उजेडांत
उपाशी भणंगाच्या हास्याचा

भुकेल्या लुकड्या कुत्र्याचा
फसफसाट आहे, गुरगुराट आहे
मी वाट आहें

. ५ .

आता संथ काळोख सरकत आहे मागे मागे
मीही पुढे चाललें आहें
दोन्हीकडचे दिवे विझवून
तिथे पलीकडे—जिथे मी संपतें—
निळ्याजांभळ्या तारांकित झुडुपापाशीं
मध्ये केवढें हें अंतर?
इतकें, इतकें की—
हें अंतरच स्वतःच्या दूरतेला भ्यालें आहे
झाडें स्तब्ध उभीं आहेत
आश्चर्याने हिरवीं पिवळीं पडून
आणि पुढे उंच
झुंजमुंजणाऱ्या गुलाबी अवकाशांत
चैतन्याचा क्षण शोषून घेणाऱ्या
उमलणाऱ्या गर्भकळीसारखी
दवांत न्हालेली
आतुर स्पंदित पहाट आहे
मी वाट आहें...

मुंबई, मार्च, १९६२

## सय

उडे झुळझुळ मळ्याच्या अंगानं
सोनेरी ताफ्त्याचें मुलायम ऊन
दूर पावरीचे सूर सारंगाचे
येती पसरीत सावल्यांची धून

स्वरांच्या काठाशीं उभी तूं बांधाशीं
धरूनिया काडी चावीत दातांत
पळसफुलांचे शिरीं लाल राघू
तुला की स्वप्नांना शीळ घालतात

चाविल्या काडीची बांधिल्या माडीची
पिवळीं पडली सय शिशिरांत
गळल्या पानांचीं सोनियाचीं बिंबें
निःशब्द उडती उन्हाच्या ऐन्यांत

मुंबई, १-४-६२

REFBK-0012740
REFBK-0012740
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92680
संदर्भ शाखा

## साठवाया सूर्य

"सूर्याच्या गतींत
किती मोडशील
किती फिरशील
सूर्यफुला?"

"साठवाया सूर्य
माझिया उरांत
फिरें उसवीत
पाकळ्या मी."

मुंबई, ३-३-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....४५११८.... वि: ....काव्य....
क्रमांक ....१९६२.... नों: दि: ....२८/३/७१